नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २१८ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS
समर्थ गांवकरी NEWS
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख!

# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
संपर्क
+91-8286562340 / 9004511593
8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com
Website: www.adarshengineering.net

सोमवार, दि. २० जुलै २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### वांगचुक यांच्यावरील कारवाईच्या निषेधार्थ कॅन्डल मार्च

कोल्हापूर (स. गांवकरी) : सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्यावरील कारवाई आणि 'नीट' परीक्षेतील कथित घोटाळ्याच्या निषेधार्थ जयसिंगपूर शहरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी व दत्त उद्योग समूहाचे अध्यक्ष गणपतराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली उत्स्फूर्त सर्वपक्षीय कॅन्डल मार्च काढण्यात आला. या मोर्चामध्ये विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी बोलताना, शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्यांवर कारवाई करून सरकार लोकशाहीचा गळा घोटत आहे, अशी सडकून टीका राजू शेट्टी यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करणाऱ्या या कॅन्डल मार्चमध्ये सहभागी नागरिकांनी हातात मेणबत्त्या घेत, लोकशाही, संविधान आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासह विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, या प्रमुख मागण्यांसाठी अतिशय शांततापूर्ण मार्गाने आपला निषेध नोंदवला.

### महामार्गावर मध्यरात्री गोळीबार

सातारा (स. गांवकरी) : रेल्वे रुळावर डबर टाकण्याच्या कंत्राटातील पैशांच्या व्यवहारातून विद्यमान सरपंचाने सहकारी मित्रावरच पिस्तुलातून दोन गोळ्या झाडल्याची थरारक घटना समोर आली आहे. दोन्ही पायाच्या मांडीतून गोळ्या आरपार गेल्याने एकजण गंभीर जखमी झाला आहे. पुणे-बंगळुरू महामार्गालगत असलेल्या पेरले गावच्या हद्दीत ही घटना घडली आहे. घटनेनंतर दोघेजण घटनास्थळावरून पळून गेले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. उंब्रज पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पेरले गावच्या शिवारात शुक्रवारी मध्यरात्री गोळीबाराची थरारक घटना घडली आहे. त्यामध्ये संतोष शंकर घोलप (वय ३७, मूळ रा. कालगाव, सध्या रा. उंब्रज, ता. कराड) हा गंभीररीत्या जखमी झाला आहे. त्याच्यावर कराडमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर संशयित सोमनाथ रमेश चव्हाण (रा. कालगाव, ता. कराड) आणि योगेश सुदाम दीक्षित (रा. मसूर, ता. कराड) या संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भरधाव कारचा भीषण अपघात

सातारा (स. गांवकरी) : सातारा–कास मार्गावरील एकीव फाटा परिसरात शुक्रवारी दुपारी झालेल्या भीषण अपघातात भरधाव कार रस्त्यालगतच्या झाडावर आदळल्याने एक जण गंभीर, तर दोघेजण किरकोळ जखमी झाले. अपघातानंतर काही काळ या मार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास महर्षी महेश मारुती पिसाळ (रा. इंदिरानगर, विलासपूर, ता. जि. सातारा) हे कार चालवत असताना वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरदार धडकली. या अपघातात राहुल अण्णा ननवरे (रा. कारंडवाडी, पोस्ट देगाव, ता. जि. सातारा) यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर साताऱ्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर वैभव किसन जाधव (रा. सासपडे, ता. जि. सातारा) आणि चालक महर्षी पिसाळ यांना किरकोळ दुखापत झाली असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि मार्गावरील प्रवाशांनी तातडीने मदतकार्य सुरू करत जखमींना रुग्णालयात दाखल केले.

# शिवतीर्थावर तरुणांची तुडुंब गर्दी

## धर्मेंद्र प्रधान नको, हे सरकार नको, ही आग टिकली पाहिजे, सरकार नको!

मुंबई : (स. गांवकरी)

तरुणाईचा अणुबॉम्ब तुमच्या बुडाखाली आधीच लागलेला आहे. त्यामुळे आता केवळ एका मंत्र्याचा राजीनामा नको, तर हे सरकारच बदलण्याचा लढा आता सुरू झाला पाहिजे, असा घणाघाती इशारा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला. नीट परीक्षा घोटाळ्याप्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आणि मोदी सरकारच्या हुकूमशाहीविरोधात सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी पुकारलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) दादर येथील शिवतीर्थावर आंदोलन केले. यावेळी जनतेला संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर सडकून टीका केली. भाषणाची सुरुवात करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, “जमलेल्या माझ्या तमाम देशभक्त बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो. आता एक पोस्टर होतं, ‘धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या’, ही एकदम क्षुल्लक गोष्ट आहे. जे सरकार आपल्याला रोटी देऊ शकत नाही, रोजगार देत नाही, शिक्षण देत नाही, उत्तर देत नाही; ते सरकार बदलण्याचा हा लढा आता सुरू झाला पाहिजे. आम्हाला आता धर्मेंद्र प्रधान नको, हे सरकार नको. मी



**उद्धव ठाकरे यांचे तडाखेबंद भाषण**

नेतृत्व करायला आलो नाही, तुम्ही सर्वांनी आता नेते व्हावं, हे सांगण्यासाठी आलो आहे. फक्त मला तुमच्याकडून एक वचन पाहिजे की, आज दिसते ती जाग आहे, आज दिसणारी आग आहे, ती हे सरकार बदलेपर्यंत टिकणार की नाही टिकणार? ही आग टिकली पाहिजे, सरकार टिकता कामा नये. या आगीमध्ये हे सरकार जळून भस्म झालं पाहिजे, तर या उठावाला अर्थ आहे. हा लढा एकट्या सोनम वांगचुक यांचा नाही. या सरकारने केवळ चंदा चोरी, व्होट चोरी नाही केली, त्यांनी तुमचं भविष्य चोरलं, या देशाचं भवितव्य चोरलं. काय दिलं या सरकारने तुम्हाला? आज मी येताना बातम्या बघत होतो, दिल्लीमध्ये जंतरमंतरच्या इकडे जणू काही युद्धाची तयारी सुरू झाली आहे. सैन्य आणतायत, फौज आणतील, कदाचित अणुबॉम्ब सुद्धा आणतील. पण या सरकारला माहिती नाहीये, या देशामधल्या तरुणाईचा जो अणुबॉम्ब आहे, हा तुमच्या बुडाखाली आधीच लागलेला आहे. ही आता जी युद्धाची तयारी आहे, ही तयारी जर का परीक्षेच्या वेळेला नीट केली असती, तर तुमच्या बुडाला सुरुंग लागला नसता.” उद्धव ठाकरे म्हणाले, “मी काय म्हणतो, एकदा होऊन जाऊ द्या; सोनम वांगचुक यांनी देशाला काय दिलं आहे आणि या दळभद्री सरकारने या देशाला काय दिलेलं आहे. जे आपले सैनिक आहेत, ते तुमच्यासारखेच आहेत. तुम्ही तरुणाई, या देशाचे भविष्य आहात. देशाचे रक्षणकर्ते तुमच्यासारखेच तरुण सरहद्दीवरती आहेत. या तरुणांसाठी मायनस टेंपरेचर... आपल्याकडे मुंबईमध्ये २०-२२ अंश तापमान झालं की, थंडी आहे बाबा, मफलर काढा. तिकडे तर बर्फात सैनिक उभे राहतात, आपल्यासाठी. ते तिकडं आहेत, म्हणून आपण इकडे आहोत. ज्याने या सैनिकांसाठी सोलर टेंट बनवले... या सैनिकांनी देशासाठी मरण्याची तयारी ठेवली, म्हणजे मेलो तरी बेहत्तर, पण माझी भारत माता जगली पाहिजे, त्या देशाच्या सैनिकांसाठी ज्याने सोलर कॅम्प बनवून दिले, टेंट बनवून दिले; तो यांच्यासाठी देशद्रोही ठरतो. तिथल्या पाण्याची टंचाई लक्षात घेऊन, ज्यांनी आईस फाउंटन तयार केले, असा हा पर्यावरणवादी, असा हा शास्त्रज्ञ, हा यांच्यासाठी देशद्रोही.

## अंबडच्या पाचोड नाक्यावर विजेच्या शॉर्टसर्किटमुळे भीषण आग

अंबड : (स. गांवकरी)



जालना जिल्ह्यातील अंबड शहरातील जालना-बिड महामार्गावरील पाचोड नाका परिसरात रविवारी (ता.19) सायंकाळी सहा वाजेच्या दरम्यान विजेचे शॉर्ट सर्किट होऊन पाच दुकानात आग लागून दुकानातील साहित्य जळून अक्षरशः कोळसा झाला आहे. यामध्ये पंधरा ते वीस लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. मात्र सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही. याबाबत सविस्तर माहिती अशी की,या परिसरात एकमेकाला लागून दहा बारा दुकाना आहेत. रविवार असल्याने काही दुकाना बंद तर काही सुरू होत्या. सकाळ पासून विजेची समस्या जाणवत होती. दुपारच्या नंतर वीज आल्यानंतर विजेचे शॉर्ट सर्किट होऊन आजूभाई शेख यांच्या आहीद गादी घराला आग लागल्याने एकच आजीचा डोंब उठल्याने लगतच असलेल्या श्रीराम फ्लॉवर हे दीपक गायकवाड यांचे दुकान, हंसराज प्रजापती यांचे स्टील प्रजापती, पप्पू जैन यांचे श्री ऑटो गॅरेज,बिलाल चायनीज या पाच दुकानाला भीषण आग लागल्याने साहित्य जळून खाक झाले आहे. तर बाजूच्या दुकानदाराने मित्रमंडळी, नातेवाईक,नागरिक यांचे मदतीने आपल्या दुकानातील साहित्य तात्काळ बाहेर काढण्यात यश आले.यामुळे यांचे होणारे नुकसान टळले आहे. आग लागल्याची वार्ता शहरासह परिसरात वाऱ्याच्या वेगाने पोहचली. नगरपालिकेची अग्निशामक दलाची गाडी, शहरातील खाजगी टँकर चालक यांनी आग विझविण्यासाठी तात्काळ धाव घेतली. पालिकेचे कर्मचारी, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, युवक मोठ्या प्रमाणात मदतीला धावले होते. सायंकाळी उशिरा जालना येथून अग्निशामक दलाची गाडी हजर झाली. तोपर्यंत आग आटोक्यात आणण्यात यश आले होते.या आगीत दुकान दाराचे दहा ते पंधरा लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. आगीचे कारण अद्यापही अस्पष्ट असले तरी विजेचे शॉर्ट सर्किट होऊन आग लागल्याचे परिसरातील दुकानदार नागरिक यांचे म्हणणे आहे. आग लागलेल्या ठिकाणी पाचोड नाका परिसरात हजारो नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. पोलिसांनी तात्काळ घटनेच्या ठिकाणी धाव घेतल्याने शांतता राखण्यासाठी प्रयत्न केले. शहरातील पाचोड नाका परिसरातील सायंकाळी विजेचे शॉर्ट सर्किट गादीघर येथे झाल्याने कापसाने पेट घेतल्याने मोठ्या प्रमाणात आग लागल्याने इतर दुकानाला आग लागल्याने हि घटना घडल्याचे परिसरातील नागरिक व इतर व्यावसायिक यांनी सांगितले.

## ओबीसी जनता पक्षाची राज्यात स्थापना : प्रा. लक्ष्मण हाके

बारामती : (स. गांवकरी)

महाराष्ट्रामध्ये ओबीसींचे कोणीच नाही या निष्कर्षाप्रत आम्ही पोहोचलेले असून या पुढे ओबीसी जनता पक्षाच्या माध्यमातून आम्ही कार्यरत राहणार असल्याची घोषणा ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी केली.

बारामतीत माध्यमांशी बोलताना लक्ष्मण हाके यांनी या पुढील काळात ओबीसींचा लढा राज्यातील कोणत्याही पक्षाच्या सोबत लढणार नसून ओबीसी जनता पक्षाच्या माध्यमातून लढू असे सांगत नव्या राजकीय पक्षाचीच घोषणा केली. हाके यांनी नमूद केले की, आमच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. ओबीसींच्या प्रश्नावर आज कोणताच राजकीय पक्ष भूमिका घेत नसल्याने या नवीन पक्षाच्या माध्यमातून आम्ही प्रश्न मांडू. भाजपचे नाव आता फोडाफोडी पक्ष ठेवायला हवे असे सांगत प्रा. हाके म्हणाले,



राज्यस्तरावर ओबीसींचे प्रश्न आम्ही प्रभावीपणे मांडू, विद्यमान कोणीही आमदार खासदार आम्हाला सोबत नको, सध्याचे विधानसभेतील ओबीसी चेहरे समाजाचे प्रश्नच मांडणार नसतील तर आम्हाला आमचा विचार करावाच लागेल. साठ टक्के लोकसंख्या ओबीसींची असतानाही कोणीही बोलत नसेल तर आम्हाला पर्याय द्यावाच लागेल, असेही ते म्हणाले. अठरा महामंडळांना अध्यक्ष व निधीही दिला जात नसेल तर सरकारचे हे अपयश असल्याचे ते म्हणाले.

## लॉर्ड्सवर भारताचा पराभव, इंग्लंडने एकदिवसीय मालिका जिंकली

मुंबई : (स. गांवकरी)

भारत आणि इंग्लंड यांच्यात आज ऐतिहासीक लॉर्ड्सवर तिसरा एकदिवसीय सामना झाला. या अटीतटीच्या सामन्यात इंग्लंडने भारताचा 27 धावांनी पराभव केला आहे. इंग्लडने सुरुवातीला फलंदाजी करताना भारतीय संघासमोर 388 धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्षाचा पाठलाग करताना भारतीय संघाला 7 विकेटच्या मोबदल्यात 360 धावा करता आल्या. या विजयासह इंग्लंडने एकदिवसीय मालिका देखील आपल्या खिशात घातली आहे.

लॉर्ड्सवर खेळल्या जात असलेल्या या सामन्यात इंग्लंड संघाकडून बेन डकेटने 141 धावांची वादळी खेळी केली. खरी खळबळ जॉस बटलरने निर्माण केली, ज्याने एकदिवसीय सामन्यांमध्ये टी-20 प्रमाणे फलंदाजी करताना 13 चेंडूंमध्ये 41 धावा केल्या. दरम्यान, 388 धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाकडून रोहित शर्माने दमदार शतकी खेळी केली. त्याचबरोबर विराट कोहलीने देखील अर्धशतकी खेळी



केली. या खेळीच्या बळावर भारताने 360 धावापर्यंत मजल मारली. लॉर्ड्सवर खेळल्या जात असलेल्या या सामन्यात इंग्लंड संघाकडून बेन डकेटने 141 धावांची वादळी खेळी केली. खरी खळबळ जॉस बटलरने निर्माण केली, ज्याने एकदिवसीय सामन्यांमध्ये टी-20 प्रमाणे फलंदाजी करताना 13 चेंडूंमध्ये 41 धावा केल्या.

इंग्लंडने लॉर्ड्सवर तिसरा एकदिवसीय सामना 27 धावांनी जिंकला. यजमान इंग्लंडने बेन डकेटच्या (141धावा) "ऐतिहासिक" खेळीच्या जोरावर 387 धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात, भारतीय संघ निर्धारित षटकांमध्ये केवळ 360 धावाच करू शकला आणि इतिहास रचण्यात अपयशी ठरला. भारताकडून रोहित शर्माने 138 आणि विराट कोहलीने 74 धावा केल्या, पण त्यांना पराभवाचे अंतर केवळ कमी करता आले. 388 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, एका क्षणी भारतीय संघ इंग्लंडच्या पुढे होता. आज भारतीय क्रिकेटमध्ये इतिहास बदलेल असे वाटत होते, पण इंग्लंडने शेवटच्या षटकांमध्ये सामना जिंकला. या विजयासह इंग्लंडने तीन सामन्यांची मालिका 2-1 ने जिंकली. भारतीय संघानेही एकदिवसीय सामन्यांमध्ये 350 किंवा 400 धावा केल्या आहेत. पण टीम इंडियाने एकदिवसीय क्रिकेटमध्ये कधी इतक्या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग केला आहे का? एकदिवसीय क्रिकेटमधील भारतीय संघाचा सर्वोच्च धावांचा पाठलाग कोणता आहे. भारतीय संघासाठी चांगली बातमी नाही, कारण त्यांनी एकदिवसीय सामन्यांमध्ये 388 किंवा त्याहून अधिक धावांचा यशस्वीपणे पाठलाग केलेला नाही. भारताचा एकदिवसीय सामन्यांमधील सर्वोच्च धावांचा पाठलाग 360 धावांचा आहे, जो त्यांनी गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्ध केला होता. याशिवाय, इतर दोन प्रसंगी टीम इंडियाने एकदिवसीय सामन्यांमध्ये 350 किंवा त्याहून अधिक धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पूर्ण केले आहे. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांविरुद्ध 351 धावांचे लक्ष्य यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

# विधेयकावरून पवारांच्या राष्ट्रवादीत मतभेद?

## 'अपना टाईम आ गया' म्हणत रोहित पवारांचा कडाडून विरोध!

मुंबई : (स. गांवकरी)

संसदेच्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या 'डिलिमिटेशन' म्हणजेच 'मतदारसंघ पुनर्रचना विधेयका'वरून राजकीय वातावरण तापू लागले आहे. अशातच, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाअंतर्गत या विधेयकावरून दोन वेगवेगळे मतप्रवाह समोर आल्याने राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत.

एकीकडे पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी या विधेयकावर संसदेत सकारात्मक चर्चेची तयारी दाखवली आहे, तर दुसरीकडे त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी या विधेयकाला कडाडून विरोध करत थेट 'बंडाचे' निशाण फडकवले आहे.

सत्ताधाऱ्यांचा संविधानावर घाला घालण्याचा आणि लोकशाही संपवण्याचा हा छुपा डाव असल्याचा आरोप करत रोहित पवारांनी कोणत्याही परिस्थितीत या विधेयकाला पाठिंबा न देण्याचे आवाहन विरोधकांना केले आहे. त्यामुळे अधिवेशनात शरद पवारांचा पक्ष नेमकी काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर एक सविस्तर पोस्ट लिहीत केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. रोहित पवार म्हणाले की, "उद्यापासून सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात 'डिलिमिटेशन विधेयक' मंजूर करून घेणे, हाच सत्ताधाऱ्यांचा मुख्य हेतू आहे. यासाठी गोड बोलून राज्यांना 50 टक्के जागा वाढवून देण्याचे आमिष दाखवले जाऊ शकते.

मात्र, या आकड्यांच्या जाळ्यात अडकून जर आपण या विधेयकाला पाठिंबा दिला, तर महापालिका निवडणुकीतील प्रभाग रचनेप्रमाणेच लोकसभा आणि विधानसभेच्या मतदारसंघांचीही केवळ स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी तोडफोड केली जाईल." आपल्या पोस्टमध्ये पुढे बोलताना रोहित पवारांनी आसामचे उदाहरण दिले. ते म्हणाले की, "भौगोलिक सीमा किंवा घटनात्मक चौकटीचा विचार



न करता केवळ सत्ता कायम राखण्यासाठी ही पुनर्रचना केली जाईल. आसाममधील मतदारसंघाची पुनर्रचना हे याचे उत्तम उदाहरण आहे. सत्तेची समीकरणे जुळवण्यासाठी 2016 पासूनच अनुभवी माजी अधिकाऱ्यांच्या मदतीने कोणत्या मतदारसंघाची कशी तोडफोड करायची, याची रणनीती भाजपाने आधीपासूनच आखली आहे. आता केवळ हे विधेयक मंजूर होण्याची त्यांना प्रतीक्षा आहे. तोपर्यंत विरोधकांशी सलोख्याचे नाटक केले जाईल. विधेयक मंजूर होताच हुकूमशाही प्रवृत्ती पुन्हा उफाळून येईल. संविधानावर घाला घालण्यासाठी एका बाजूला डिलिमिटेशन आणि दुसऱ्या बाजूला SIR अशी जोरदार तयारी सुरू आहे. हा डाव आपण एकजुटीने उधळून लावला पाहिजे." रोहित पवारांनी या विधेयकाविरोधात अत्यंत आक्रमक आणि थेट विरोधाची भूमिका घेतली असताना, खासदार सुप्रिया सुळे यांनी मात्र संसदीय लोकशाहीच्या चौकटीत राहून या विषयावर चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे. रोहित पवारांनी विरोधकांना एकत्र येण्याचे आवाहन करताना शेवटी लिहिले की, "देशातील तरुणांनीच परिवर्तन घडवण्याचा आता निर्धार केला आहे, तर त्यांना आपण प्रामाणिक साथ दिली पाहिजे. संघर्ष करायचा की तडजोड? हा निर्णय ज्याचा त्याने घ्यावा.

## महापुरुषांना जातीच्या तुरुंगातून मुक्त करा : सुनील देवधर

पुणे : (स. गांवकरी)

देशातील महापुरुषांना विसरण्याची प्रवृत्ती वाढत असून, जे स्मरणात आहेत त्यांनाही जातीच्या चौकटीत अडकवले जात आहे, ही परिस्थिती चिंताजनक असल्याचे मत भाजपचे राष्ट्रीय सचिव सुनील देवधर यांनी व्यक्त केले. महापुरुषांच्या केवळ जयंती साजऱ्या करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचे जतन आणि आचरण करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. लोकमान्य स्मृती प्रतिष्ठानतर्फे टिळक स्मारक सभागृहात आयोजित लोकमान्य टिळक जयंती सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी कीर्तनकार चारुदत्त आफळे, नगरसेवक कुणाल टिळक, अश्विनी गानू, शुभम कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी आणि कवी संदीप खरे यांना ‘लोकमान्य टिळक सामाजिक एकात्मता पुरस्कार’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सुनील देवधर पुढे म्हणाले की, लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर इंग्लंडला पाठवलेल्या तारेत ‘नंबर एक आता नाही’ असा उल्लेख करण्यात आला होता, यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ताकद स्पष्ट होते. देशाच्या उत्तरेकडील भागात त्यांना ‘भगवान टिळक’ म्हणून संबोधले



जाते, मात्र महाराष्ट्रात तशी भावना दिसून येत नाही, याची खंत त्यांनी व्यक्त केली. टिळकांनी स्वभाषेत शिक्षणाचा आग्रह धरत ‘न्यू इंग्लिश स्कूल’च्या माध्यमातून भारतीय शिक्षणाची दिशा बदलण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांनी भारतीय समाजात हीन भावना निर्माण करण्यासाठी आणलेल्या शिक्षण पद्धतीला त्यांनी ठाम विरोध केला होता. सध्याच्या नवीन शैक्षणिक धोरणाचा आत्मा आणि टिळकांचे विचार यामध्ये साधर्म्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच गणेशोत्सवाच्या माध्यमातून टिळकांनी युवकांना संघटित करून स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली, असे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### माणुसकी फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

अक्कलकोट (स. गांवकरी) : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेत लोकसहभागातून शैक्षणिक मदतीचा हात पुढे केल्याचे प्रेरणादायी उदाहरण बोरोटी (खु.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेत पाहायला मिळाले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलाराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अन्नछत्र मंडळाच्या सहयोगातून माणुसकी फाउंडेशनच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या व विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य गोपाल लोहार होते. यावेळी माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष अनंत क्षीरसागर, उपाध्यक्ष आकाश शिंदे, सदस्य आशिष हुंबे, बाबू भालके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धाराम बिराजदार, राजू हालोळ्ळी, गोपाल लोहार, काशिनाथ वाडी, श्रीशैल कोळी, प्रभाकर सनगुंदी, सुरेश कोळी, शिक्षक शरणप्पा फुलारी व अंजली वाघमारे आदी उपस्थित होते. यावेळी अनंत क्षीरसागर, आकाश शिंदे व आशिष हुंबे यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. भविष्यातही शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माणुसकी फाउंडेशनच्या माध्यमातून आवश्यक ती मदत करण्याची ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमादरम्यान शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धाराम बिराजदार, सदस्य गोपाल लोहार, राजू हालोळ्ळी व काशिनाथ वाडी यांनी माणुसकी फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक शरणप्पा फुलारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन अंजली वाघमारे यांनी केले. कार्यक्रमास पालक, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.



### संवाद वारी डिजिटल चित्र रथाला आशिष शेलार, भरणे यांची भेट

सोलापूर (स. गांवकरी) : संवादवारी डिजिटल चित्ररथाला माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज  बेलवडी येथे सदिच्छा भेट दिली. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यादरम्यान त्यांनी डिजिटल चित्ररथातील विविध आधुनिक तंत्रज्ञानाधारित उपक्रमांची पाहणी केली. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्यावतीने आषाढी वारीनिमित्त 'संवाद वारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी त्यांनी राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना, विकासकामे आणि जनहिताच्या योजनांची माहिती प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या डिजिटल सादरीकरणाची पाहणी केली. तसेच चित्ररथामध्ये उपलब्ध असलेल्या एआय आधारित चॅटबॉट प्रश्नमंजुषेचा अनुभव घेत शासनाच्या विविध योजनांबाबत प्रश्न विचारले. वारकऱ्यांना सोप्या आणि आकर्षक पद्धतीने माहिती देणाऱ्या या उपक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. 'संवाद वारी' ही नागरिकांशी प्रभावी संवाद साधणारी संकल्पना असून, डिजिटल माध्यमांचा वापर करून शासनाच्या योजना अधिक सुलभ, आकर्षक आणि परिणामकारक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचविण्याचा हा स्तुत्य प्रयत्न असल्याचे मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही वारीसारख्या मोठ्या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्यात शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी उभारण्यात आलेला हा डिजिटल चित्ररथ अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले. एआयसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नागरिकांना त्वरित आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देण्यासाठी असे प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

### विशेष मतदार पुनरीक्षणअभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा



ठाणे (स. गांवकरी) : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार यादी पुनरीक्षण अभियान (SIR-2026) अंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क सुरक्षित राहावा, यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या अभियानात सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा असे आवाहन शिवसेना दिवा उपशहरप्रमुख तथा नगरसेवक शैलेश पाटील यांनी केले आहे. या मोहिमेअंतर्गत बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) घराघरांत जाऊन मतदार पडताळणी, अर्जांचे वितरण आणि भरलेले अर्ज स्वीकारण्याचे काम करत आहेत. नागरिकांनी BLO यांनी दिलेले फॉर्म काळजीपूर्वक भरून आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत जमा करावेत, असेही त्यांनी सांगितले. शैलेश पाटील यांनी नागरिकांना आपल्या तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांची नावे मतदार यादीत आहेत की नाही, याची ECINet App किंवा voters.eci.gov.in या संकेतस्थळावर तपासणी करण्याचे आवाहन केले आहे. ज्यांचे नाव मतदार यादीत नसेल त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा.

### जनहिताच्या प्रश्नांवर अंतापूरकर आक्रमक; प्रशासनाची घेतली झाडाझडती

बिलोली (स. गांवकरी) : जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांवर आमदार जितेश अंतापूरकर यांनी प्रशासनाला जाब विचारत जनहिताच्या मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडली. वीजपुरवठा, पीक विमा, अवैध रेती उत्खनन, स्मशानभूमी विकास,पाणी टंचाई प्रश्न तसेच इतर पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी करत पालकमंत्री अतुल सावे यांचे मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नाकडे वेधले लक्ष बैठकीत आ.अंतापूरकर यांनी महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्याचा मुद्दा प्राधान्याने उपस्थित केला. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाने वीज मिळणे, कृषीपंपांना वेळेवर वीज उपलब्ध न होणे आणि तांत्रिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील नागरिक व शेतकरी त्रस्त असल्याचे त्यांनी सांगितले. वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

# जनतेच्या तक्रारींचा ऑन दि स्पॉट निपटारा

- केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जनता दरबारातील तक्रारीवर दिले संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश






सिदखेडराजा : (स. गांवकरी)

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारीं तात्काळ निकाली काढून सेवा प्रधान कराव्यात असे निर्देश केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज अधिकाऱ्यांना दिल्यात.

नागरीकांच्या तक्रारी समस्याची तात्काळ सोडवणूक करण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव व प्रशासकिय अधिकारी त्यांच्या उपस्थितीत बुलडाणा जिल्हातील सातही विधानसभा मतदार संघ निहाय जनता दरबाराचे आयोजन करण्यात येणार आहे. या जनता दरबार कार्यक्रमाचा शुभारंभ आज राष्ट्रमाता जिजाऊंची जन्मभुमितुन झाला  सिंदखेड राजा येथील मातोश्री मंगल कार्यालयात पहिला जनता दरबार घेण्यात आला होता केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राष्ट्रमाता जिजाऊंच्या अर्पण करून व दीप प्रज्वलन करून केली यावेळी व्यासपीठावर माजी आमदार खेडेकर अतिरिक्त जिल्हाधिकारी रमेश कव्हळे उपविभागीय अधिकारी संजय खडसे उपजिल्हाधिकारी पोळ उपविभागीय पोलीस अधिकारी श्री ठोसरे सिदखेड राजाचे तहसिलदार अजित दिवटे देऊळगाव राजाचे तहसीलदार वैशाली डोंगरजाळ शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीराम मापारी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के नगराध्यक्ष सौरभ तायडे योगेश जाधव यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे यांनी जनता दरबार संदर्भात दाखल झालेल्या तक्रारी आणि कार्यक्रमाची रूपरेषा प्रस्ताविकातून सांगितली त्यानंतर झालेल्या तक्रारींचा तक्रारदारांच्या समक्ष चर्चा करण्यात आली व अधिकाऱ्यांना या तक्रारीवर तात्काळ कारवाई करून त्याचे निराकरण करण्याच्या सुचना यावेळी संबंध अधिकारी कर्मचाऱ्यांना देण्यात आला ... शेत रस्त्या अभावी शेतकऱ्यांच्या पेरण्या रखडणार नाही घ्याची प्रशासनाने दखल घ्यावी ... अधिकाऱ्यांनी सजक राहुन जनतेला सेवा प्रधान करावी . तक्रार दखल करणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे व समस्या तात्काळ निकाली काढाव्यात असे ही केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या जनता दरबारात सांगितले या जनता दरबारमध्ये शेत रस्ते घरकुल , पाणी पुरवठा , महसुल , पोलीस , महिला व बाल कल्याण अधिकारी , विद्युत मंडळ ,नरेगा , कृषी , सह विविध विषया वरील 300 जनतेच्या तक्रारी प्राप्त झाला होत्या या तक्रारीची अधिकाऱ्यासमावेत चर्चा करण्यात आली ..या जनता दरबार मध्ये दाखल झालेल्या तक्रारींचं निराकरण प्रशासकीय अधिकाऱ्यांनी किंवा नाही त्या संदर्भात मंत्री महोदयांच्या जनसंपर्क कार्यालयातुन पुरावा करण्यात येणार आहे

**जनतेच्या तकरींचा तात्काळ निपटारा करण्यासाठी सिदखेडराजा येथे आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले . जनतेच्या समस्या तात्काळ निपटरा करण्यासाठी या जनता दरबाराचा आयोजन करण्यात आले होते जर अधिकारी आपल्या कर्तव्यात कसूर करत असतील तर त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश संबंधीत विभागाच्या वरिष्ठांना देण्यात आले आहेत .**

## कार्तिकेयन आषाढी वारी संपेपर्यंत पंढरपूर येथेच मुक्कामी राहणार

सोलापूर : (स. गांवकरी)

आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने दहा मानाच्या पालख्यांसोबत अन्य पालख्याही पंढरपूरकडे निघालेल्या आहेत. श्री संत ज्ञानेश्वर महाराज तसेच श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांबाबतची कामे दिलेल्या सूचनांप्रमाणे होत आहेत की नाही, याची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी माळशिरस तालुक्यातील दोन्ही पालखी मार्गांची पाहणी केली. तसेच मुक्काम, विसावा व रिंगण या ठिकाणांना भेटी देऊन मार्गदर्शक सूचना दिल्या. बोंडले येथे पाहणी करताना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी विसाव्याच्या ठिकाणी व रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, तसेच स्वच्छता व्यवस्था ठेवण्याबाबत निर्देश दिले. बोंडले येथे इमर्जन्सी ऑपरेटिंग सेंटरचे (EOC) काम त्वरित



पूर्ण करावे आणि पालख्या बाहेर पडण्याच्या मार्गावर मुरूम टाकावा. महामार्गावर आवश्यकतेनुसार रम्बलर व गतिरोधक बसवावेत, तसेच क्रॅश बॅरियर्स व इतर सुरक्षा उपाययोजना करण्याबाबतही त्यांनी निर्देशित केले. वेळापूर येथे रस्त्याची पाहणी करताना जिल्हा परिषदेने मंजूर केलेल्या दोन्ही रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावीत, पालखीतळाचे मुरमीकरण व सपाटीकरण करावे, जर्मन हँगरचे काम लवकर पूर्ण करावे व जर्मन हँगरच्या बाजूला असलेला मोठा खड्डा तात्काळ बुजवण्याबाबतचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

## महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशनची हिंगोली जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**अभियंत्यांच्या हक्कांसाठी संघटना अधिक सक्रिय होणार; अमितकुमार काबरा यांची जिल्हाध्यक्षपदी निवड**

वसमत : (स. गांवकरी)





महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशनच्या केंद्रीय समितीच्या मार्गदर्शनाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी हिंगोली जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. राज्याध्यक्ष इंजी. प्रदीप पडोळे, राज्य महासचिव इंजी. एम. ए. हकीम तसेच हिंगोलीचे माजी जिल्हाध्यक्ष इंजी. गुलाम कुरेशी आणि इंजी. विठ्ठल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये वसमत येथील इंजी. अमितकुमार बालकृष्ण काबरा यांची हिंगोली जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय आणि खासगी क्षेत्रात कार्यरत असलेल्या अभियंत्यांसह सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना संघटनेच्या माध्यमातून एका व्यासपीठावर आणणे, त्यांच्या समस्या आणि प्रलंबित मागण्यांना वाचा फोडणे तसेच त्या शासन आणि संबंधित विभागांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, हा नवीन कार्यकारिणीचा प्रमुख उद्देश राहणार आहे. अभियंत्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सकारात्मक आणि संघटित पद्धतीने कार्य करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. जिल्हाध्यक्षपदी इंजी. अमितकुमार बालकृष्ण काबरा (वसमत), उपाध्यक्षपदी इंजी. दिनेश जाधव, जिल्हा सचिवपदी इंजी. भूषण देवेंद्र जैस्वाल, तर कोषाध्यक्षपदी इंजी. शेख मोइन शेख गुलाम यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा समन्वयक म्हणून इंजी. गुलाम कुरेशी (औंढा बालापूर), इंजी. विठ्ठल शिंदे (सेनगाव), इंजी. जयप्रकाश फेगडे (वसमत) आणि इंजी. नचिकेत शिंदे (कळमनुरी) यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यावेळी इंजी. नेहाल शेख, इंजी. योगेश घुगे, इंजी. अनिल शेळके, इंजी. धनराज गोरे, इंजी. योगेश कुरवाडे, इंजी. अमित अवसरमल, इंजी. संकेत इंगोले, इंजी. प्रवीण कांबळे, इंजी. सय्यद अशनफ, इंजी. सय्यद अशरफ अली यांच्यासह जिल्ह्यातील अनेक अभियंते आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंते उपस्थित होते. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष इंजी. अमितकुमार काबरा यांनी पदभार स्वीकारल्यानंतर जिल्ह्यातील अभियंत्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. अभियंत्यांच्या विविध समस्या आणि अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या मागण्या संबंधित विभाग तसेच शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी संघटना सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना उपलब्ध रोजगार आणि व्यवसायाच्या संधींबाबत योग्य मार्गदर्शन करणे, त्यांना न्याय्य संधी मिळवून देण्यासाठी संबंधित यंत्रणांकडे सकारात्मक पाठपुरावा करणे तसेच तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्याच्या विकासात अभियंत्यांचा सहभाग आणि योगदान वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## मांजरगाव विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी गणपतराव सानप

**महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेकडून जाहीर सत्कार**

नाशिक : (स. गांवकरी)

निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी संस्थापक,माजी पोलीस पाटील गणपतराव सानप यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे सर यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक सोमनाथ सोनवणे (अध्यक्ष), माजी चेअरमन संदीप सानप, सरपंच सुनील सोनवणे, सेवानिवृत्त आरोग्य सहाय्यक शाम बर्वे, संतोष सोनवणे, सुरेश सोनवणे, डॉ. सचिन सोनवणे, माणिक सोनवणे, राजू सोनवणे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सत्कारप्रसंगी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे म्हणाले, "मांजरगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटी ही गावाच्या सहकार चळवळीचा भक्कम पाया असून या संस्थेची उभारणी करणारे संस्थापक स्व. अंबादासनाना उगले,गणपतराव सानप,पांडुरंग महादु सोनवणे, लक्ष्मण सोनवणे,यशवंत सोनवणे, दगू नागरे, स्व.एकनाथ हाडपे, स्व. बाबुराव हाडपे, स्व. दगू सोनवणे आणि स्व. चिंधू सोनवणे यापैकी अनेक मान्यवर आज आपल्यात नसले, तरी त्यांनी रुजविलेली सहकाराची मूल्ये, निःस्वार्थ सेवा आणि विकासाची परंपरा आजही गावाला प्रेरणा देत आहे. संस्थापक गणपतराव सानप यांची चेअरमनपदी झालेली निवड ही त्यांच्या प्रदीर्घ कार्याचा गौरव असून पोलीस पाटील म्हणून कार्यरत असताना गावात सलोखा, लोकसहभाग आणि विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले. महाराष्ट्र शासनाच्या 'गाव तंटामुक्त' अभियानात मांजरगावला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवून देत त्यांनी गावाचा नावलौकिक राज्यभर वाढवला. सहकार, सामाजिक,शैक्षणिक आणि ग्रामविकास क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वाखाली सोसायटी शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी अधिक सक्षमपणे कार्य करेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे.गणपतराव सानप यांच्यासारखे अनुभवी नेतृत्व लाभणे ही मांजरगावसाठी अभिमानाची बाब आहे,असे बाळासाहेब सोनवणे यांनी सांगितले. यावेळी चेअरमन गणपतराव सानप यांनी सत्काराबद्दल महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे, उपस्थित मान्यवर आणि ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानले. संस्थापकांनी जपलेली सहकाराची परंपरा अधिक बळकट करत शेतकरी, सभासद आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख कार्य करण्याचा माझा प्रयत्न राहील,अशी भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक सोमनाथ सोनवणे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या, तर आभार माजी चेअरमन संदीप सानप यांनी मानले. यावेळी ग्रामस्थांनी नव्या नेतृत्वाविषयी समाधान,विश्वास आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

## जिल्हा परिषदेत दोन नव्या पुरस्कारांची मागणी

आळेफाटा : (स. गांवकरी)



दि. १९:- जिल्हा परिषदेत चांगले काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधींचा सन्मान व्हावा यासाठी जिल्हा परिषद पुणेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांनी दोन नवीन पुरस्कार सुरू करावेत यासाठी वीरधवल जगदाळे, अध्यक्ष, जिल्हा परिषद पुणे, विवेक दादा वळसे पाटील, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद पुणे तसेच गजानन पाटील साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांच्याकडे मागणी केली पत्रात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या नावाने जिल्हा परिषदेमध्ये आदर्श काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना "स्व. अजितदादा पवार आदर्श जिल्हा पदाधिकारी पुरस्कार" सुरू करावा. तसेच पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय जालिंदर भाऊ कामटे यांच्या नावाने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एका आदर्श सरपंचाची निवड करून त्यांना "स्व. जालिंदर भाऊ कामटे आदर्श सरपंच पुरस्कार"देण्यात यावा. गावपातळीपासून जिल्हापातळीपर्यंत प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे, हा या मागणीमागील उद्देश असल्याचे श्री. पवार यांनी पत्रात नमूद केले आहे. या दोन्ही पुरस्कारांची सुरुवात याच वर्षापासून करावी यासाठी सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

# छत्रपती संभाजीराजे यांचा नाशिक रिंग रोड बाधित आंदोलनाला जाहीर पाठिंबा

**आंदोलन अधिक व्यापक व तीव्र होण्याचे संकेत दूरध्वनीवरून करण गायकर यांच्याशी संवाद; लवकरच आंदोलनस्थळी भेट देणार**

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक सिंहस्थ कुंभमेळा परिक्रमा मार्ग (रिंग रोड) प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी छावा क्रांतिवीर सेनेचे अध्यक्ष श्री. करण गायकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले आमरण अन्नत्याग आंदोलन आज चौथ्या दिवशीही निर्धाराने सुरू असून,आंदोलनाला राज्यभरातून वाढता जनसमर्थन मिळत आहे.




आज 'स्वराज्य'चे प्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी श्री. करण गायकर यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच नाशिक रिंग रोड बाधित शेतकऱ्यांचा लढा हा न्याय,सन्मान आणि अस्तित्वाचा लढा असल्याचे सांगत आंदोलनाला जाहीर पाठिंबा व्यक्त केला.प्रशासनाने आंदोलक शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये, तातडीने सकारात्मक चर्चा करून त्यांच्या न्याय्य मागण्या मान्य कराव्यात,असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत 'स्वराज्य' संघटना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील,अशी ग्वाही त्यांनी दिली.तसेच लवकरच आंदोलनस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन आंदोलक शेतकऱ्यांशी संवाद साधणार असल्याचेही त्यांनी सांगितले. याचबरोबर नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन सुमारे अर्धा तास आंदोलक शेतकऱ्यांसोबत बसून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शेतकरी प्रतिनिधींनी सादर केलेले निवेदन स्वीकारून सर्व मागण्या शासन स्तरावर प्रभावीपणे मांडून त्या तडीस नेण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. काल अन्नत्याग आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी विविध राजकीय,सामाजिक व शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी आंदोलनस्थळी भेट देत जाहीर पाठिंबा दर्शविला.यामध्ये मा.आमदार नरेंद्र दराडे,मा.आमदार जीवा पांडू गावित,अ‍ॅड.शिवाजी सहाने,शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे गटनेते केशव पोरजे,काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बबलू खैरे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे छबु नागरे,नगरसेवक योगेश भोर,शिवसेना (शिंदे गट) नगरसेविका इंदुबाई नागरे, हर्षदा गायकर,नितीन दातीर,सामाजिक कार्यकर्ते धीरज शेळके,परफेक्ट फ्रुट मार्केटचे संचालक बापू पिंगळे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बनकर, कम्युनिस्ट पक्षाचे इरफान शेख,कालिका देवस्थान अध्यक्ष अण्णा पाटील,ॲड दीपक पाटोदकर, ॲड अजिंक्य गीते,ॲड प्रशांत जाधव,मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष नितीन सुगंधी, गवळवाडी शेतकरी संघर्ष कृती समिती तसेच संभाजी ब्रिगेडचे जिल्हाप्रमुख प्रफुल वाघ व त्यांच्या सर्व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. तसेच 'स्वराज्य'च्या वतीने डॉ. रुपेश नाठे पाटील,केशव गोसावी,ज्ञानेश्वर थोरात,नितीन पाटील,सागर पवार,रेखा जाधव,रोशन खैरे,राघिनी आहेर,संदीप अवारे आणि सुमीत कडवे यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून शेतकऱ्यांना पाठिंबा दिला.

या सर्व मान्यवरांचे,सामाजिक संघटनांचे,शेतकरी संघटनांचे व जनतेचे आंदोलनाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

दरम्यान, आंदोलनाचा चौथा दिवस सुरू असतानाही प्रशासनाकडून कोणताही ठोस लेखी निर्णय दिलेला नाही. केवळ आश्वासने व वेळकाढूपणाचे धोरण अवलंबले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.एकीकडे शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावले जाते,तर दुसरीकडे बैठकीत कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही, अशी आंदोलकांची भूमिका आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## आदिवाशी दिनाची उत्सव समिती गठीत

रावेर (स. गांवकरी) : आज यावल शेतकी संघ येथे जमातीचे जेष्ठ नेते आदरणीय श्री प्रभाकर आप्पा सोनवणे (वढोदा) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आदिवासी दिन उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी भालोद गावाचे सरपंच श्री प्रदीप भाऊ कोळी, यांची तर उपाध्यक्ष पदी फैजपूर मा.उपनगराध्यक्षा १)कु.निकिताताई प्रकाश कोळी, २) श्री दिपक भाऊ कोळी (यावल) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच बैठकीस आंदोलन समन्वय समितीचे अध्यक्ष आदरणीय श्री जितेन्द्र सपकाळे सर (भुसावळ) व कोळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्री हरिलाल भाऊ कोळी (कांडवेल), विविध गावांचे सरपंच, सदस्य, नगरसेवक, युवा कायदेशीर सल्लागार, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, जेष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, तरूण व पत्रकार बंधू उपस्थित होते.



## तांदलवाडी येथे विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप

रावेर (स. गांवकरी) : तालुक्यातील तांदलवाडी येथील जिल्हा परिषद मराठी मुलांची केंद्र शाळेत शासनाच्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह, प्रेरणा व आवड निर्माण व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी तांदलवाडी ग्रामपंचायत सदस्या सौ. साधना योगेश्वर कोळी, तसेच महाएकता फाउंडेशन तांदलवाडीचे अध्यक्ष श्री. योगेश्वर कोळी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मंगेश उन्हाळे, समिती सदस्य सीमा चौधरी, ललिता भोई, शिक्षणतज्ज्ञ अशोक फकीरा महाजन , तसेच शिक्षक श्री. दत्तात्रय तायडे व प्रभाकर गंभिर पाटील ,आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, उपस्थितांनी शासनाच्या या उपक्रमाचे स्वागत केले आहे.




## लायन्स क्लब, जुन्नर शिवनेरीच्या अध्यक्षपदी सचिन जंगम

नारायणगाव (स. गांवकरी) : सुमारे 30 वर्षांपासून जुन्नर तालुक्याच्या सामाजिक जडणघडणीत नेहमीच मोलाची भर घालणाऱ्या लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या अध्यक्षपदाची सूत्रे आज सचिन जंगम यांनी स्वीकारली. राष्ट्रीय महामार्गावरील जीवन हॉलमध्ये झालेल्या या सोहळ्यात क्लबचे आंतरराष्ट्रीय संचालक राजेंद्र मुछाल व जिल्हा संपर्क अधिकारी रवींद्र सातपुते यांच्या हस्ते पदग्रहण समारंभ पार पडला. यावेळी सचिव डॉ. विलास नायकोडी, खजिनदार स्वप्निल भोर, लिओ अध्यक्ष सिद्धेश कांबळे, सचिव यश कांबळे, खजिनदार कौस्तुभ गावडे यांनी नवीन वर्षाचा पदभार स्वीकारला. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सर्पदंशउपचार तज्ञ डॉ. सदानंद राऊत व डॉ. पल्लवी राऊत यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन यावेळी गौरविण्यात आले. या सोहळ्यास माजी आमदार अतुल बेनके, नारायणगावचे उपसरपंच बाबू पाटे, जिल्हा परिषद सदस्य मंगेश काकडे, रोटरी क्लब नारायणगावचे अध्यक्ष अमित बेनके, जुन्नर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत काचळे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष विकास दरेकर, दीपक वारुळे, जितेंद्र गुंजाळ,शिरीष जठार,किशोर पोखरणा, ट्रस्ट अध्यक्ष डॉ. प्रदीप जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढील बारा महिन्यात समाज हिताचे बारा विविध उपक्रम राबविले जाणार असून यात पर्यावरण,कॅन्सर व मधुमेह जनजागृती व तपासणी, मोतीबिंदू व नेत्र तपासणी, युवक करिअर मार्गदर्शन, गरजूंसाठी अन्नदान व अनाथआश्रम, योग प्रशिक्षण, महिला सबलीकरण आदी प्रकल्प प्रामुख्याने असणार आहेत, तसेच गरजूंसाठी व्हीलचेअर, कमोड चेअर, वॉकर आदी आवश्यक उपकरणांची कायमस्वरूपी 'बँक' उभारणार असल्याचे यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन जंगम यांनी सांगितले. अजित वाजगे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर डॉ. विलास नायकोडी यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## शामगहानजवळ आयशर टेम्पो आणि कारची समोरासमोर धडक

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील सापुतारा–शामगहान राष्ट्रीय महामार्गावर आज पुन्हा एकदा भीषण अपघात झाला. शामगहानजवळील धोकादायक वळणावर आयशर टेम्पो आणि कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील नाशिकहून माल घेऊन अहमदाबादकडे जाणारा आयशर टेम्पो आणि सुरतहून सापुताऱ्याकडे जाणारी GJ-05-JE-3991 क्रमांकाची कार शामगहान जवळील वळणावर एकमेकांना धडकल्या. अपघातात दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. कारमधील सुरतचे पर्यटक किरकोळ जखमी झाले असून, सुदैवाने सर्वांचा थोडक्यात बचाव झाला. मोठी जीवितहानी टळल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक घटनास्थळी धावले. संबंधित यंत्रणेलाही घटनेची माहिती देण्यात आली असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

# टेंट हाऊस चालकांकडून नियमांची पायमल्ली; प्रशासनाचे दुर्लक्ष?

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील सापुताराच्या पायथ्याशी असलेल्या मालेगाव गावात आदिवासी शेतकऱ्यांच्या 73AA जमिनीवर आवश्यक परवानग्या न घेता तीन टेंट हाऊस उभारून जंगल ट्रेकिंगसह विविध ॲडव्हेंचर उपक्रम सुरू असल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून हे प्रकार सुरू असूनही जिल्हा प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



स्थानिकांच्या माहितीनुसार, मालेगावमध्ये तीन ठिकाणी टेंट हाऊस सुरू आहेत. त्यामध्ये (१) सोमाभाई महादेभाई गायकवाड यांच्या जमिनीवर राजूभाई मोढवाडिया यांचे, (२) सुरेशभाई बन्सीभाई भोये यांच्या जमिनीवर गोपालभाई पादरिया यांचे आणि (३) काशीरामभाई सोमाभाई ठाकरे यांच्या जमिनीवर ऋषिराज मोरी यांचे टेंट हाऊस कार्यरत आहेत. आरोपानुसार या तिन्ही ठिकाणी ग्रामपंचायत, नगर नियोजन, वन विभाग किंवा इतर संबंधित शासकीय विभागांची आवश्यक परवानगी न घेता पर्यटकांना निवास, भोजन, जंगल ट्रेकिंग आणि ॲडव्हेंचर उपक्रमांची सुविधा पुरवली जात आहे. याशिवाय, दक्षिण वन विभागाच्या श्यामगहान रेंजमधील जंगलात ट्रेकिंगसारखे उपक्रम राबवून वनसंपदेचे नुकसान होत असल्याचाही आरोप आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, सुरक्षिततेच्या निकषांचे पालन न करता केवळ आर्थिक फायद्यासाठी हे उपक्रम सुरू आहेत.

या उपक्रमांदरम्यान एखाद्या पर्यटकावर वन्यप्राण्यांचा हल्ला झाला किंवा अपघात होऊन जीवितहानी झाली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच ट्रेकिंगदरम्यान प्लास्टिक व इतर कचरा जंगलात टाकला जात असल्याने पर्यावरण आणि वन्यजीवांनाही धोका निर्माण होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात लक्झरी बसमधून पर्यटक येथे येत असल्याने मालेगावचा अरुंद अंतर्गत रस्ता वाहतुकीच्या प्रचंड ताणाखाली आला आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून रस्त्याचेही नुकसान होत असल्याची तक्रार आहे. आरोपानुसार, टेंट हाऊस चालकांकडून जिल्हाधिकाऱ्यांचा बिगरशेती (NA) आदेश असल्याचा दावा करून इतर कोणत्याही विभागाची परवानगी आवश्यक नसल्याचे सांगितले जाते. मात्र तज्ज्ञांच्या मते, केवळ NA आदेश मिळाल्याने टेंट हाऊस, होमस्टे, ॲडव्हेंचर स्पोर्ट्स किंवा जंगल ट्रेकिंगसारखे व्यावसायिक उपक्रम कायदेशीर ठरत नाहीत. त्यासाठी संबंधित विभागांच्या स्वतंत्र परवानग्या आणि सर्व सुरक्षा नियमांचे पालन अनिवार्य असते.

नियमांनुसार अशा उपक्रमांसाठी ग्रामपंचायतीची परवानगी, आवश्यकतेनुसार नगर नियोजन व बांधकाम मंजुरी, पर्यटन विभागाच्या नियमांचे पालन, प्रशिक्षित मार्गदर्शक, सुरक्षा साहित्य, आपत्कालीन व्यवस्था, जंगल ट्रेकिंगसाठी वन विभागाची परवानगी, पर्यावरण व वन्यजीव संरक्षण नियमांचे पालन, प्लास्टिकबंदी, कचरा व्यवस्थापन तसेच पर्यटकांसाठी विमा सुविधा आवश्यक असते. मात्र या सर्व नियमांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप आहे.

स्थानिकांनी जिल्हा प्रशासन, वन विभाग, ग्रामपंचायत, पोलीस आणि संबंधित विभागांनी तातडीने चौकशी करून सर्व परवानग्यांची पडताळणी करावी, अनियमितता आढळल्यास संबंधित टेंट हाऊस चालक आणि जमीनमालकांवर कायदेशीर कारवाई करून तिन्ही टेंट रिसॉर्ट सील करावेत, अशी मागणी केली आहे. अन्यथा येत्या काळात मुख्यमंत्री स्तरापर्यंत तक्रार नेण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

उल्लेखनीय म्हणजे, काही दिवसांपूर्वीच डांग जिल्ह्याचे उपजिल्हा विकास अधिकारी एच. बी. पटेल यांनी जिल्ह्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या टेंट हाऊस, रिसॉर्ट, हॉटेल आणि होमस्टे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींच्या तलाठी-कम-मंत्र्यांना निर्देश दिले होते. त्यामुळे सापुतारा पायथ्यावरील मालेगावमधील या तीन टेंट हाऊसवर प्रत्यक्षात कारवाई होणार की त्यांना अभय दिले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## फिजिक्सवालाने विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा उत्सव केला साजरा

पुणे : (स. गांवकरी)

एज्युकेशन कंपनी फिजिक्सवाला ने नीट 2026 चे निकाल जाहीर केले असून अनेक विद्यार्थ्यांनी नीट ऑल इंडिया रँक मध्ये उच्च स्थान मिळवले आहे. रविकांत दिवाकर , शिवांश आनंद , दिव्यांश जायसवाल आणि साक्षी कुमारी हे काही उच्च कामगिरी करणारे विद्यार्थी आहेत. ही कामगिरी फिजिक्सवाला ने दिलेल्या लवचिक शिक्षण पद्धतीचे उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी आपापल्या आवडीनुसार आणि शिकण्याच्या पद्धतीनुसार ऑनलाइन कोर्सेस किंवा ऑफलाइन, टेक-सक्षम फिजिक्सवाला विद्यापीठ केंद्रांमधून शिकून उच्च गुण मिळवले. याशिवाय, पुणे येथे विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आयुष राज हे शहरातील फिजिक्सवाला चे उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी एक होते. “माझ्या मेहनतीचे फळ



मिळाले याचा मला खूप आनंद आहे, रविकांत दिवाकर म्हणाले, “माझ्या मेहनतीचे फळ मिळाले याचा मला खूप आनंद आहे. फिजिक्सवाला च्या बॅचेसनी माझे सर्व संभ्रम दूर केले. शिक्षकांनी कॉन्सेप्ट्स इतक्या स्पष्टपणे समजावून सांगितले की मला फॉर्म्युलामागचा लॉजिक खरोखर समजला, फक्त पाठांतर नाही. कठीण प्रश्नात अडकलो की व्हिडिओ एक्स्प्लेनेशनने लगेच योग्य स्टेप्स दाखवल्या, ज्यामुळे माझा बराच वेळ वाचला.”

## महाराष्ट आणि गोवा राज्यातील परिक्रमेनंतर स्वामी समर्थ पादुका पालखी अन्नछत्र मंडळामध्ये विसावली

अक्कलकोट : (स. गांवकरी)

श्री स्वामी समर्थांची पालखी अक्कलकोट मध्ये विसावली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसलेयांच्या नेतृत्वाखाली गेल्या २८ वर्षांपासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा काढण्यात येत आहे.

यंदाचे २९ वे वर्ष असून, ८ महिने पालखी पादुका महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा राज्यातून परिक्रमा होऊन दि. १५ जुलै रोजी सायंकाळी पावसाच्या रिमझिम सरी झेलत, अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! श्री अन्नपूर्णा माता की जयच्या जयघोषात तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत आगमन होऊन, अन्नछत्र मंडळात विसावली आहे.



दरम्यान, सोलापूरहून आगमन होताच श्रीक्षेत्र अक्कलकोट मार्गावर असलेल्या विजय बाग पालखी विसावा येथे हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले यांनी पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले. तर विजयव्हिला फार्म हाऊस येथे अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या उपस्थितीत, विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, स्वामिनीराजे अमोलराजे भोसले यांच्यासह हिरकणी संस्थेच्या महिला पदाधिकारी व सदस्यांनी दर्शन घेतले व पालखीचे पूजन करण्यात आले.

श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे खंडोबा मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पालखीचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. याप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, अमोलराजे जनमेजयराजे भोसले, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते पूजनानंतर बुधवार पेठेतील समाधी मठ येथेही पूजा संपन्न झाली.

या प्रसंगी चोळप्पा यांचे वंशज उपस्थित होते. शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूकीने पालखी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे आगमन झाल्यानंतर आरती संपन्न झाली. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचा सत्कार संपन्न झाला. यावेळी व्यंकटेश पुजारी व मोहित पुजारी यांच्यासह देवस्थान समितीचे सेवेकरी कर्मचारी उपस्थित होते.

## मधुमेहींसाठी डोळ्यातील इंजेक्शनला पर्यायी उपचार

### अमेरिकेतील जागतिक नेत्रविज्ञान परिषदेत पुण्याच्या आयुर्वेदप्रेरित संशोधनाची दखल

पुणे : (स. गांवकरी)

मधुमेहामुळे होणाऱ्या डायबेटिक रेटिनोपॅथीच्या उपचारासाठी वारंवार डोळ्यात इंजेक्शन घेण्याची गरज कमी करू शकणाऱ्या आयुर्वेदप्रेरित उपचारपद्धती विकसित करण्यात आली आहे. या उपचारपद्धतीवरील संशोधनाची दखल अमेरिकेतील जगातील सर्वात मोठ्या नेत्रविज्ञान परिषदेत घेण्यात आली आहे. पुण्यातील रसायनी बायोलॉजिक्स यांनी विकसित केलेल्या 'तिमिरेक्स-आर' या नॅनोतंत्रज्ञानाधारित तोंडावाटे घेण्याच्या उपचारपद्धतीवरील संशोधनाची असोसिएशन फॉर रिसर्च इन व्हिजन अँड ऑप्थॅल्मोलॉजी (एआरव्हीओ) २०२६, या प्रतिष्ठेच्या परिषदेसाठी निवड झाली. अमेरिकेतील डेन्व्हर येथे झालेल्या या परिषदेत जगभरातील सुमारे ११ हजार नेत्रतज्ज्ञ सहभागी झाले होते. भारताच्या पारंपरिक वैद्यकशास्त्राचे प्रतिनिधित्व करत या



परिषदेत संशोधन सादर करणारे डॉ. योगेश बेंडाळे हे एकमेव संशोधक ठरले. हे संशोधन रसायु आयुर्वेद क्लिनिकमध्ये करण्यात आले असून, संशोधन पथकात डॉ. अविनाश कदम, डॉ. केतकी जगताप आणि डॉ. प्राजक्ता पोटे यांचा सहभाग होता.

मधुमेहामुळे होणारा डायबेटिक रेटिनोपॅथी हा टाळता येण्याजोग्या अंधत्वामागील प्रमुख कारणांपैकी एक मानला जातो. भारतात १० कोटींहून अधिक नागरिक मधुमेहाने ग्रस्त असून, त्यातील अनेकांना पुढे डोळ्यांच्या गंभीर गुंतागुंतींचा सामना करावा लागतो. अशा रुग्णांना दृष्टी टिकवण्यासाठी वारंवार डोळ्यात इंजेक्शन घ्यावे लागते. मात्र या उपचारामुळे रुग्णांना वेदना, मानसिक ताण, वेळ आणि खर्चाचा मोठा भार सहन करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या अभ्यासात पूर्वी अनेक वेळा डोळ्यात इंजेक्शन घेऊनही अपेक्षित सुधारणा न झालेल्या रुग्णांचा समावेश करण्यात आला होता. ऑप्टिकल कोहेरन्स टोमोग्राफी (ओसीटी) तपासणीत उपचारानंतर रेटिनावरील सूज कमी झाल्याचे आणि डोळ्यांच्या रचनेत अनुकूल बदल झाल्याचे संशोधकांनी नमूद केले आहे. संशोधनानुसार, निरीक्षण कालावधीत अशा सुमारे ९० टक्के रुग्णांना पुन्हा डोळ्यात इंजेक्शन घेण्याची गरज भासली नाही. तसेच उपचारादरम्यान कोणतेही गंभीर दुष्परिणाम आढळले नसल्याचा दावा संशोधनात करण्यात आला आहे. 'तिमिरेक्स-आर' या उपचारपद्धतीला अमेरिका तसेच इतर देशांमध्ये आंतरराष्ट्रीय पेटंट संरक्षणही मिळाले आहे. याबाबत डॉ. योगेश बेंडाळे म्हणाले, "आयुर्वेद हे केवळ परंपरागत ज्ञान नसून आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध होऊ शकणारी उपचारव्यवस्था आहे. भारतात विकसित झालेले हे संशोधन भविष्यात मधुमेहामुळे दृष्टी गमावण्याच्या धोक्याशी सामना करणाऱ्या लाखो रुग्णांसाठी आशादायी ठरू शकते. नेत्रविज्ञान क्षेत्रातील सर्वोच्च वैज्ञानिक व्यासपीठ मानल्या जाणाऱ्या 'एआरव्हीओ' परिषदेत पुण्यातील या संशोधनाची झालेली निवड ही भारतीय आयुर्वेद, आधुनिक विज्ञान आणि स्वदेशी संशोधन क्षमतेला मिळालेली महत्त्वाची आंतरराष्ट्रीय मान्यता आहे."

## झिथारा.एआयची पाल्मोनाससोबत धोरणात्मक भागीदारी

हैदराबाद : (स. गांवकरी)

PALMONAS zithara.ai

ऑफलाइन किरकोळ व्यवसायांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ग्राहक संवाद आणि व्यवस्थापन सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या झिथारा.एआयने ज्वेलरी क्षेत्रातील पाल्मोनाससोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीच्या माध्यमातून ग्राहकांना अधिक वैयक्तिक आणि प्रभावी खरेदी अनुभव देण्याबरोबरच ग्राहकांशी दीर्घकालीन संबंध निर्माण करणे आणि व्यवसायाच्या महसुलात वाढ करणे हा प्रमुख उद्देश आहे. या भागीदारीअंतर्गत पाल्मोनासकडून झिथारा.एआयच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ग्राहक संबंध व्यवस्थापन प्रणालीचा वापर केला जाणार आहे. विविध माध्यमांतून उपलब्ध होणारी ग्राहकांची माहिती एकत्रित करून त्यांच्या संवादाचा एकाच ठिकाणी आढावा घेणे या प्रणालीमुळे शक्य होणार आहे. तसेच ग्राहकांचे वर्गीकरण, स्वयंचलित संपर्क आणि त्यांच्या आवडी व गरजांनुसार वैयक्तिक संदेश पाठवण्याची सुविधाही उपलब्ध होणार आहे.

ऑनलाइन चौकशी करणारे ग्राहक आणि प्रत्यक्ष दुकानांना भेट देणारे ग्राहक यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठीही ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. ग्राहकांच्या आवडीनिवडींचे विश्लेषण करून योग्य वेळी त्यांच्याशी संपर्क साधणे, प्रभावी विपणन मोहिमा राबवणे आणि ग्राहकांना पुन्हा खरेदीसाठी प्रोत्साहित करणे यामुळे शक्य होणार आहे. परिणामी ग्राहक दीर्घकाळ ब्रँडशी जोडले जाण्यासह विक्री आणि उत्पन्नवाढीलाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

# नीट यूजी २०२६ मध्ये आकाशचा सोहम पाटील पुणे शहरात अव्वल

## देशात ५३ वा क्रमांक : ७२० पैकी ६९५ गुणांची उल्लेखनीय कामगिरी; निखिल बेवलचाही देशात ३८९ वा क्रमांक

■ वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील आकाशच्या विद्यार्थ्यांची यशाची परंपरा कायम

पुणे : (स. गांवकरी)

राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडच्या पुणे शाखेतील विद्यार्थी सोहम पाटील याने राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा अर्थात ‘नीट यूजी २०२६’मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सोहमने ७२० पैकी तब्बल ६९५ गुण मिळवत अखिल भारतीय स्तरावर ५३ वा क्रमांक पटकावला असून, पुणे शहरात अव्वल स्थान मिळवल्याचा दावा संस्थेने




केला आहे. आकाशच्या पुणे येथील पुलगेट शाखेच्या वर्गातील नियमित अभ्यासक्रमाचा विद्यार्थी असलेल्या सोहमच्या या यशामुळे संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. सातत्यपूर्ण मेहनत, दृढनिश्चय, शिस्तबद्ध अभ्यास आणि नियोजनबद्ध तयारीच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले. त्याच्या या यशामागे संस्थेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सुसंघटित शिक्षण पद्धतीचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे संस्थेने म्हटले आहे. पुण्यातील पुलगेट शाखेतीलच नियमित वर्गातील विद्यार्थी निखिल बेवल यानेही नीट यूजी २०२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. निखिलने ७२० पैकी ६७५ गुण मिळवत अखिल भारतीय स्तरावर ३८९ वा क्रमांक प्राप्त केला आहे. सोहम आणि निखिल या दोन्ही विद्यार्थ्यांच्या यशामुळे पुणे शाखेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण कामगिरीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाल्याचे संस्थेने नमूद केले. आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने नीट यूजी २०२६ मध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या परीक्षेत आकाशच्या चार विद्यार्थ्यांनी देशातील पहिल्या दहा क्रमांकांमध्ये स्थान मिळवले आहे. त्याचबरोबर १८ विद्यार्थ्यांनी पहिल्या ५० मध्ये, तर ४१ विद्यार्थ्यांनी देशातील पहिल्या १०० विद्यार्थ्यांमध्ये स्थान पटकावले आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील हे निकाल संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षण पद्धतीचा परिणाम असल्याचे संस्थेने म्हटले आहे. अनुभवी शिक्षक, सर्वसमावेशक अभ्यास साहित्य, नियमित सराव परीक्षा, विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विश्लेषण, शंका निरसन सत्रे आणि वैयक्तिक मार्गदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयार केले जात असल्याचेही संस्थेकडून सांगण्यात आले. ‘पुणे शहरात अव्वल येणे म्हणजे स्वप्न सत्यात उतरल्यासारखे’ आपल्या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सोहम पाटील म्हणाला, “अखिल भारतीय स्तरावर ५३ वा क्रमांक मिळवून पुणे शहरात अव्वल स्थान प्राप्त करणे हे माझ्यासाठी स्वप्न सत्यात उतरल्यासारखे आहे. माझ्यावर नेहमी विश्वास ठेवणाऱ्या माझ्या आई-वडिलांचे आणि सातत्याने मार्गदर्शन व प्रेरणा देणाऱ्या आकाशमधील शिक्षकांचे मी मनापासून आभार मानतो.” “नियमित सराव परीक्षा, कामगिरीचे सविस्तर विश्लेषण, शंका निरसन सत्रे आणि शिस्तबद्ध वर्गातील शिक्षणामुळे माझ्या संकल्पना अधिक पक्क्या झाल्या. संपूर्ण तयारीच्या काळात अभ्यासावर लक्ष केंद्रित ठेवण्यासही यामुळे मोठी मदत झाली.

# शिळफाटा व कल्याण फाट्यावर सिग्नल यंत्रणा बसणार

## नगरसेवक बाबाजी पाटीलांच्या पाठपुराव्याला यश

ठाणे : (स. गांवकरी)

शिळफाटा- कल्याणफाटा परिसरातील दिवसेंदिवस होणारी वाहतूक कोंडी आणि वारंवार घडणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. या महत्त्वाच्या चौकात वाहतूक सिग्नल बसविण्याच्या कामास अखेर मंजुरी मिळाली असून, प्रभाग क्रमांक २९ चे नगरसेवक बाबाजी पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. या भागातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी स्थानिक नागरिक व विविध संस्थांनी सातत्याने मागणी केली होती. त्यानुसार नगरसेवक बाबाजी पाटील यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, ठाणे महानगरपालिका, वाहतूक विभाग तसेच MSRDC यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. या मागणीची दखल घेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरव राव यांच्यासोबत बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. आमदार राजेश मोरे यांनीही



प्रशासन आणि वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन ही समस्या मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले. तसेच जून महिन्यात झालेल्या ठाणे महानगरपालिकेच्या महासभेत नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील आणि नगरसेविका वेदिका पाटील यांनी हा विषय प्रभावीपणे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे अखेर या कामास मंजुरी मिळाली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या वतीने आता उपरोक्त ठिकाणी वाहतूक सिग्नल उभारण्याचे काम हाती घेतले जाणार असून लवकरच केबल टाकणे, सिग्नलसाठी खांब उभारणे आणि संपूर्ण यंत्रणा बसविण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. हा सिग्नल कार्यान्वित झाल्यानंतर परिसरातील वाहतूक अधिक शिस्तबद्ध होण्यास मदत होईल. तसेच अपघातांचे प्रमाण कमी होऊन नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सुलभ होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या प्रभाग क्रमांक २९ मधील लोकप्रतिनिधींचे नागरिकांकडून अभिनंदन व आभारही व्यक्त केले जात आहेत.



ठाणे : दिवा रेल्वे स्थानकात दुपारी फलाट क्र १ वर लोकल येत असताना रुळावर गाय आल्याने आपघात झाला प्रसंगी गाय लोकल खाली गेली समजताच मोटरमनने तात्काळ लोकल थांबवली. प्रसंगी गायला लोकल खाली असतानाच पाय बांधण्यात आले व लोकल पुढे गेल्यावर बजरंग दलाच्या तरुणांनी तसेच रेल्वे पोलीस व सुरक्षा बलाच्या जवानांनी गाईला सुखरूप बाहेर काढले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### दिव्यात SIR विशेष कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे (स. गांवकरी) : दिवा (पश्चिम) येथील गावदेवी मंदिराजवळील टीएमसी शाळेत रविवारी आयोजित करण्यात आलेल्या SIR (Document Verification & Digitization) विशेष कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या आयोजित या कॅम्पमध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून आपल्या मतदार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व डिजिटल नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केली. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत झालेल्या या विशेष कॅम्पमध्ये नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. मतदार यादीतील माहिती अद्ययावत करण्यासाठी तसेच आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून डिजिटायझेशन प्रक्रिया सुलभ करण्यात आली. कॅम्पच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख भालचंद्र भगत, शाखाप्रमुख अश्विन चौधरी तसेच उपस्थित सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनी नागरिकांना सहकार्य केले. कॅम्पसाठी नागरिकांनी दोन पासपोर्ट साईज फोटो, आधार कार्डची झेरॉक्स प्रत, मतदार ओळखपत्राची प्रत (उपलब्ध असल्यास) तसेच आई-वडिलांच्या मतदार ओळखपत्रांच्या प्रती (उपलब्ध असल्यास) सोबत आणण्याचे आवाहन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांना लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येकाने वेळेत मतदार नोंदणी व कागदपत्र पडताळणी पूर्ण करण्याचे आवाहनही करण्यात आले.



### शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेच्या स्वरूप कांबळेचे विविध परीक्षांत सुयश

कल्याण (स. गांवकरी) : कल्याण शहरातील लाल चौकी येथील शारदा मंदिर संस्थेच्या शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेचा इयत्ता ८ वी च्या वर्गात शिकत असलेला विद्यार्थी स्वरूप जयराम कांबळे याने मागील वर्षी झालेल्या मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत केंद्रामध्ये ५ वा क्रमांक, जिल्ह्यामध्ये ७५ वा तर राज्यामध्ये ८२ वा क्रमांक प्राप्त केला आहे. इयत्ता ७ वी च्या स्कॉलरशिप परीक्षेतही त्याने सुयश प्राप्त केले आहे. या यशाबद्दल नुकतच शारदा मंदिर हायस्कूल कल्याण शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख आणि वरिष्ठ शिक्षिका अपर्णा कुलकर्णी यांच्या हस्ते बक्षीस देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. अभ्यासाबरोबरच नाटकातही त्याला काम करायला आवडते.

### ६१ बुथवर एस. आर. फॉर्म भरण्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी

कल्याण (स. गांवकरी) : १३९ मुरबाड विधानसभा मतदारसंघमधील कल्याण तालुका ग्रामीण मधील ६१ बुथमध्ये एस. आर. अंतर्गत बिएलोमार्फत घरोघरी जाऊन मतदारांचे फॉर्म भरून घेण्याबाबत तात्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत तहसिलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी १३९ मुरबाड विधानसभा मतदारसंघ यांना मुरबाड तहसिल कार्यालयात निवेदन देण्यात आले.हे निवेदन किरण केणे उपाध्यक्ष काँग्रेस कमिटी ठाणे जिल्हा ग्रामीण आणि अमोल सुरोशी अध्यक्ष युवक काँग्रेस कल्याण तालुका ग्रामीण यानी दिले.यावेळी निवडणूक नायब तहसिलदार मुरबाड यांनी सांगितले की बिएलो यांना याबाबत सुचना देऊन प्रत्येक मतदाराचे फॉर्म योग्य पध्दतीने भरले जातील.कुठलाही मतदार हा मतदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेतली जाईलअसे त्यांनी सांगितले.



# कोट्यवधींच्या विकासकामांनंतरही मूलभूत सुविधांचा अभाव

## मान्सून फेस्टिव्हलपूर्वी वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

डांग गुजरात : (स. गांवकरी)

गुजरातमधील एकमेव गिरिस्थान असलेले सापुतारा पावसाळ्यात नैसर्गिक सौंदर्याने खुलून आले आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, हिरवागार निसर्ग आणि मुसळधार पावसाचा आनंद घेण्यासाठी दररोज हजारो पर्यटक सापुताऱ्यात दाखल होत आहेत. मात्र, पर्यटकांची वाढती गर्दी आणि अपुरी वाहतूक व्यवस्था यामुळे पर्यटनाचा आनंद अनेकांसाठी त्रासदायक ठरत आहे. सापुताऱ्यात प्रवेश करताच मुख्य रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. अनेक वेळा तासन्तास वाहतूक कोंडी होत असल्याने पर्यटकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. याशिवाय, पुरेशा पार्किंग सुविधेअभावी वाहन उभी



करण्यासाठी पर्यटकांना बराच वेळ भटकंती करावी लागत असून, त्यामुळे त्यांच्या पर्यटनाचा आनंदही कमी होत आहे. गुजरात पर्यटन विभागाने सापुताऱ्याच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यवधी रुपयांची विकासकामे केल्याचा दावा केला असला, तरी वाढत्या पर्यटकसंख्येच्या तुलनेत पार्किंगची अपुरी व्यवस्था, वाहतूक नियोजनाचा अभाव आणि सार्वजनिक सुविधांवरील वाढता ताण यामुळे मूलभूत सुविधांची कमतरता स्पष्टपणे दिसून येत आहे. दरवर्षी पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होत असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात अपयश आल्याचे चित्र आहे.

सध्या केवळ आठवड्याच्या शेवटच्या दिवशी (वीकेंड)च वाहतूक कोंडीची गंभीर समस्या निर्माण होत आहे. येत्या काही दिवसांत मान्सून फेस्टिव्हलला सुरुवात झाल्यानंतर पर्यटकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता असल्याने वाहतूक आणि पार्किंगचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिक आणि पर्यटकांचे म्हणणे आहे की, सापुताऱ्याला अधिक सुव्यवस्थित पर्यटनस्थळ बनविण्यासाठी अतिरिक्त पार्किंगची व्यवस्था, प्रभावी वाहतूक नियोजन, तसेच रस्त्यांच्या कडेला आणि पार्किंग परिसरातील अतिक्रमण तातडीने हटविणे आवश्यक आहे. मान्सून फेस्टिव्हलपूर्वी प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

# कै. प्रशांत दिलीप सोनार यांच्या जन्मदिनानिमित्त मानव सेवा केंद्रात भोजनदान

रावेर : (स. गांवकरी)

कै. प्रशांत दिलीप सोनार (विसपुते) यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन म्हणून मानव सेवा केंद्र, चोपडा येथे समाजोपयोगी भोजनदान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मानव सेवा केंद्रातील गरजू, निराधार व गरजवंतांना प्रेमाने भोजन देऊन त्यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण करण्यात आली. हा उपक्रम मानव सेवा केंद्र, श्री शांती विहार, सरकारी आय.टी.आय. जवळ, शुगर फॅक्टरी रोड, वेले, ता. चोपडा, जि. जळगाव येथे पार पडला. उपस्थितांनी कै. प्रशांत सोनार यांच्या प्रेमळ स्वभाव, सेवाभावी वृत्ती, समाजाप्रती असलेली आत्मीयता आणि माणुसकी जपणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी उपस्थितांनी सांगितले की, अशा सेवाभावी



उपक्रमांमधून कै. प्रशांत सोनार यांच्या सामाजिक विचारांना आणि कार्याला खरी मानवंदना मिळत असून, त्यांच्या स्मृती समाजसेवेच्या माध्यमातून सदैव जिवंत राहतील. या भोजनदान उपक्रमासाठी एकविरा ज्वेलर चे संचालक श्री. दिलीप चिंधुशेठ सोनार (विसपुते), श्री. भुषण दिलीप सोनार (विसपुते), चि. मित्त प्रशांत सोनार (विसपुते) आणि चि. हर्ष भुषण सोनार (विसपुते) यांच्यासह समस्त सोनार (विसपुते) परिवार, रावेर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# मधुमेहींसाठी डोळ्यातील इंजेक्शनला पर्यायी उपचार

पुणे : (स. गांवकरी)

मधुमेहामुळे होणाऱ्या डायबेटिक रेटिनोपॅथीच्या उपचारासाठी वारंवार डोळ्यात इंजेक्शन घेण्याची गरज कमी करू शकणाऱ्या आयुर्वेदप्रेरित उपचारपद्धती विकसित करण्यात आली आहे. या उपचारपद्धतीवरील संशोधनाची दखल अमेरिकेतील जगातील सर्वात मोठ्या नेत्रविज्ञान परिषदेत घेण्यात आली आहे. पुण्यातील रसायनी बायोलॉजिक्स यांनी विकसित केलेल्या 'तिमिरेक्स-आर' या नॅनोतंत्रज्ञानाधारित तोंडावाटे घेण्याच्या उपचारपद्धतीवरील संशोधनाची असोसिएशन फॉर रिसर्च इन व्हिजन अँड ऑप्थॅल्मोलॉजी (एआरव्हीओ) २०२६, या प्रतिष्ठेच्या परिषदेसाठी निवड झाली. अमेरिकेतील डेन्व्हर येथे झालेल्या या परिषदेत जगभरातील सुमारे ११ हजार नेत्रतज्ज्ञ सहभागी झाले होते. भारताच्या पारंपरिक वैद्यकशास्त्राचे प्रतिनिधित्व करत या परिषदेत संशोधन सादर करणारे डॉ. योगेश बेंडाळे हे एकमेव संशोधक ठरले. हे संशोधन रसायु आयुर्वेद क्लिनिकमध्ये करण्यात आले असून, संशोधन पथकात डॉ. अविनाश



■ अमेरिकेतील जागतिक नेत्रविज्ञान परिषदेत पुण्याच्या आयुर्वेदप्रेरित संशोधनाची दखल

कदम, डॉ. केतकी जगताप आणि डॉ. प्राजक्ता पोटे यांचा सहभाग होता.

मधुमेहामुळे होणारा डायबेटिक रेटिनोपॅथी हा टाळता येण्याजोग्या अंधत्वामागील प्रमुख कारणांपैकी एक मानला जातो. भारतात १० कोटींहून अधिक नागरिक मधुमेहाने ग्रस्त असून, त्यातील अनेकांना पुढे डोळ्यांच्या गंभीर गुंतागुंतींचा सामना करावा लागतो. अशा रुग्णांना दृष्टी टिकवण्यासाठी वारंवार डोळ्यात इंजेक्शन घ्यावे लागते.

# वास्तुरचनाकारांनी नवतंत्रज्ञानासह प्रयोगशील व सर्जनशील वृत्ती अंगीकारावी

## आर्कि. अजय सोनार यांचे प्रतिपादन; 'एसएमईएफ'तर्फे आयोजित 'ब्रिक १२ ऑन १२' प्रदर्शनातून वास्तुकलेतील नवकल्पनांना चालना

पुणे : (स. गांवकरी)

"बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भावी वास्तुरचनाकारांनी नवतंत्रज्ञानाची सांगड सर्जनशीलता, संशोधन आणि प्रयोगशीलतेशी घालणे आवश्यक आहे. समाजाभिमुख, पर्यावरणपूरक आणि शाश्वत वास्तुरचना हीच काळाची गरज असून, विद्यार्थ्यांनी केवळ इमारतींची रचना न करता लोकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडविणारी दृष्टी विकसित करावी," असे प्रतिपादन प्रसिद्ध वास्तुविशारद तथा 'ए फॉर आर्किटेक्चर'चे सहसंस्थापक आर्कि. अजय सोनार यांनी केले.

सतीश मिसाळ एज्युकेशनल फाउंडेशनच्या ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे आयोजित 'ब्रिक १२ ऑन १२' या प्रदर्शनावेळी सोनार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उपक्रमाचे हे आठवे वर्ष होते. आघारकर रस्त्यावरील सारथी संस्थेच्या सभागृहात आयोजित या दोन दिवसीय उपक्रमात १२ निवडक विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १२ मिनिटांत आपल्या वास्तुकलेशी संबंधित संशोधन, संकल्पना आणि डिझाइन सादर केले. यासोबतच



वार्षिक प्रदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा मेळावा, तज्ज्ञांची व्याख्याने आणि परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध डिझाइन संकल्पना, संशोधन प्रकल्प आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचे प्रदर्शन उपस्थितांनी पाहिले. वास्तुकला क्षेत्रातील तज्ज्ञ, माजी विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत करिअरच्या संधी, आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योगातील बदलत्या अपेक्षांविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधनवृत्तीला आणि व्यावसायिक तयारीला चालना देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमावेळी प्रख्यात वास्तुरचनाकार आर्कि. राजीव विश्वासराव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे, संस्थेच्या संस्थापक संचालिका डॉ. पूजा मिसाळ, प्राचार्या डॉ. पूर्वा केसकर, उपप्राचार्या आर्कि. मनाली देशमुख, आर्कि. अभंग कांबळे, आर्कि. नलिनी निंबाळकर, आर्कि. मयुरेश शिरोळकर, डॉ. वैदेही लवांड, डॉ. श्रद्धा माहोरे-मांजरेकर, डॉ. सुधीर देशपांडे, आर्कि. अक्षय गांधी, आर्कि. इरावती नाथ यांच्यासह वास्तुरचना क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. आर्कि. राजीव विश्वासराव यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक जगातील अनुभव सांगत वास्तुकलेत तांत्रिक कौशल्याबरोबरच सामाजिक जबाबदारी, स्थानिक गरजांची जाण आणि सातत्याने शिकण्याची वृत्ती महत्त्वाची असल्याचे सांगितले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे यांनी संशोधनाधारित शिक्षण, नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि बहुआयामी विचारसरणी यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. 'बियॉंड डिझाईन: द स्ट्रॅटेजी बिहाइंड सक्सेसफुल प्रोजेक्ट्स' या विषयावरील चर्चासत्रात आर्कि. विजय साने, आर्कि. अदिती वाटवे, आर्कि. रोहित सरदेसाई, आर्कि. कनिका अग्रवाल यांनी विचार मांडले. संस्थेच्या संस्थापक संचालिका डॉ. पूजा मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांसमोर आपले विचार मांडण्याची संधी उपलब्ध करून देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि व्यावसायिक जगासाठी सक्षम बनविणे हा 'ब्रिक १२ ऑन १२' उपक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले. डॉ. पूर्वा केसकर यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सादरीकरण कौशल्य, संशोधनवृत्ती आणि व्यावसायिक दृष्टी विकसित होत असल्याचे नमूद केले.

# धर्मपुरी येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे जल्लोषात स्वागत

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले भक्तिमय वातावरणात पादुकांचे पुजन

सोलापूर : (स. गांवकरी)

धर्मपुरी येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे जल्लोषात पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्वागत केले भक्तिमय वातावरणात पादुकांचे पुजन करून त्यांनी सोलापूर जिल्ह्यात संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी ने प्रवेश केला असल्याचे सांगितले. तर सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून पालखी वर पुष्पवृष्टी करून मोठ्या उत्साहाने स्वागत करण्यात आले. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून पादुका पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. सोलापूर जिल्हा



प्रशासनाकडून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रथावर पुष्पवृष्टी करण्यात आली

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे आज धर्मपुरी येथे भक्तिमय व टाळ-मृदंगाच्या गजरात आगमन झाले. यावेळी ग्रामविकास विभाग व जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका चे दर्शन घेऊन पुष्पहार अर्पण करत मोठ्या उत्साहाने स्वागत केले. यावेळी सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालखी रथावर पुष्पवृष्टी करण्यात आली. टाळ मृदुंगाच्या गजरात पालकमंत्री पालखी सोबत चालले. धर्मपुरी पालखीतळावर वारकरी भाविक व ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. राम कृष्ण हरी...'ज्ञानोबा माऊली, तुकाराम' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. पोलीस बँड पथकाने बँड मधून भक्तीमय धून वाजवून पालखीचे स्वागत उत्साहाने केले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त ह. भ. प. श्री भावार्थ देखणे महाराज यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी आमदार उत्तम जानकर, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील, सोलापूर पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सातारा पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, सातारा मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, तहसीलदार सुरेश शेजुळ यांच्यासह दोन्ही जिल्ह्यातील संबंधित अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालखीच्या स्वागतासाठी धर्मपुरी पालखीतळावर जिल्हा प्रशासनाने चोख व्यवस्था केली आहे. पिण्याचे पाणी, स्वच्छता, वैद्यकीय पथक, वीज, वाहतूक व कायदा-सुव्यवस्था याबाबत विशेष नियोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी आरोग्य विभागाच्या वतीने वारकरी भाविकांची प्राथमिक आरोग्य तपासणी केली जात आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने हिरकणी कक्ष सज्ज ठेवण्यात आलेला आहे. त्याबरोबरच भाविकांच्या पायाने आराम मिळावा साठी फूट मसाज मशीनची व्यवस्था करण्यात आली असून हजारो भाविक याचा लाभ घेत आहे. त्याप्रमाणेच वारकऱ्याच्या आरोग्य सेवेसाठी आरोग्य दूत, आरोग्य बाईक तैनात करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे



## चरगाव शाळेच्या बाजूचा विजेचा पोल तात्काळ हटवावा

अंबरनाथ (स. गांवकरी) : अंबरनाथ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा चरगाव या शाळेच्या बाजूला असलेला लाईटचा पोल तात्काळ हटवावा अशी मागणी सहाय्यक अभियंता सोनिवली बदलापूर पश्चिम यांच्याकडे करण्यात आलेली आहे. या संदर्भात अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही सदरचा धोकादायक पोल अजूनही हटवला नाही. हा लाईटचा पोल शाळेच्या अगदी जवळ असल्यामुळे विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून तो धोकादायक आहे. तरी संबंधित प्रशासनाने सदरचा विजेचा पोल तात्काळ हटवावा अशी मागणी केली जात आहे. पत्रकार भरत दळवी यांनीही याबाबत संबंधित प्रशासनाचे अधिकारी यांच्याकडे संपर्क साधून सदरचा धोकादायक विजेचा पोल अन्यथा हलवावा अशी मागणी केली आहे.

## शेतकरी बांधवांनी पिक विमा योजनेत सहभागी व्हावे : कृषी अधिकारी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम सन २०२६ अंतर्गत पिक विमा भरणे चालू असून आज रोजी पर्यंत १ लाख ६५ हजार ३५१ शेतकऱ्यांनी २ लाख ८८ हजार ५०७ विमा अर्ज दाखल केले असून १ लाख ८६ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचा विमा उतरविला आहे. पिक विमा नोंदीची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ आहे. यंदा जिल्ह्यात पाऊस कमी आहे सध्या अनेक भागात पावसाचे नितांत गरज आहे. पुढील काळातही कमी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे याचा परिणाम खरिपातील पिकांवर होत आहे. उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पिक विमाची संरक्षण गरजेचे पिक विमा भरण्याची अंतिम दिनांक ३१ जुलै २०२६ असुन यामध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही. शेवटच्या दिवसांची वाट न बघता ज्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेमध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी लवकरात लवकर सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घ्यावा : विशेष अभियानास प्रारंभ

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांना मिळावा यासाठी शासनाच्या निर्देशानुसार १ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत विशेष जनजागृती व अर्ज नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. शासनाच्या प्रचलित तरतुदीनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५ टक्के, इतर शेतकऱ्यांना ३० टक्के अनुदान मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत देण्यात येईल. तसेच उर्वरित १० किंवा १५ टक्के अनुदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना / बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अंतर्गत अदा करण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकूण ९० टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध होईल. महाडीबीटी पोर्टलवरील अर्जांची संख्या कमी असलेल्या गावांमध्ये विशेष जनजागृती करण्यात येणार असून तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज भरून घेण्यावर भर दिला जाणार आहे. तालुका कृषी अधिकारी अर्धापूर यांचेमार्फत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्व पात्र शेतकऱ्यांना या विशेष अभियानाचा लाभ घेऊन महाडीबीटी पोर्टलवर तात्काळ अर्ज नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित मंडळ कृषी अधिकारी किंवा सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

## नांदेड जिल्ह्यात धनादेश अनादराची 23 प्रकरणे तडजोडीने निकाली

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र के. ब्रम्हे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड मुख्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणांसाठी विशेष लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. विशेष लोकन्यायालय यशस्वी होण्यासाठी वकील आणि बँक अधिकाऱ्यांसमवेत पूर्वनियोजित बैठका घेण्यात आल्या. तसेच तालुकास्तरीय न्यायाधीशांशी आभासी (ऑनलाईन) पद्धतीने संवाद साधून नियोजन करण्यात आले. या विशेष लोकन्यायालयामध्ये नांदेड जिल्ह्यातील एकूण 23 धनादेश अनादराची प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. या माध्यमातून 29 लाख 44 हजार 156 रुपये इतक्या रकमेची वसुली करण्यात आली. लोकन्यायालयामुळे संबंधित पक्षांचा वेळ, श्रम आणि खर्चाची बचत होऊन न्यायदानाची प्रक्रिया अधिक सुलभ व जलद होते. विशेष लोकन्यायालयाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा व तालुका न्यायालयांतील न्यायाधीश, कर्मचारी, शिपाई, जिल्हा न्यायालयाचे अधीक्षक, व्यवस्थापक तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद जी. देशपांडे यांनी या विशेष लोकन्यायालयाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## सिटी सर्व्हेची मागणी; गटनेते नेम्मानीवार यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



किनवट (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या 26 मे 2026 च्या शासन निर्णयानुसार किनवट शहराचा नवीन सिटी सर्व्हे (नगर भूमापन) करून नागरिकांना अद्ययावत प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी, अशी मागणी भाजपचे गटनेते तथा माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास किशनराव नेम्मानीवार यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे केली. निवेदनात किनवट शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मालमत्तेवरील वाद, बँक कर्जातील अडचणी आणि खरेदी-विक्री व्यवहारातील फसवणूक टाळण्यासाठी सिटी सर्व्हे अत्यावश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच आगामी सर्वसाधारण सभेत हा विषय मंजूर करून प्रस्ताव जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, नांदेड यांच्याकडे तातडीने पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे. या सर्वेक्षणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार भीमराव केराम यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्याचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे.

# आरोग्य तपासणीद्वारे विठू माऊलीच्या वारकऱ्यांची सेवा

सोलापूर : (स. गांवकरी)



आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरकडे विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या वारकऱ्यांना आरोग्यसेवेचा आधार देण्यासाठी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (एफपीएआय), सोलापूर शाखा, रोटरी ई-क्लब ऑफ सोलापूर एलिट, श्री दिगंबर बुवा कुलकर्णी ट्रस्ट, गीतगंगा सोशल फाउंडेशन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष,लॅब टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उपलप मंगल कार्यालय येथे 'ग्रो प्रोजेक्ट' अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचा लाभ शेगाव येथून श्री गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांसह गजानन महाराजांच्या दर्शनासाठी आलेल्या स्थानिक भाविकांनी घेतला. सकाळी १० ते सायंकाळी ५.३५ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या शिबिरात ४०० हून अधिक वारकरी व भाविकांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय सेवा देण्यात आल्या. शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणी, औषधोपचार, हिमोग्लोबिन व रक्तातील साखरेची तपासणी, आयसीटीसी सेवा, समुपदेशन तसेच फिजिओथेरपी अशा विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

यावेळी जिल्हा सरकारी वकील तथा सी. बी. आय. कौन्सिल अॅड. प्रदीपसिंह राजपूत, डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, युवा प्रतिनिधी अनुज जिंदम, सृष्टी सर्वगोड, सेजल कांबळे, गीतगंगा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष वेंकटेश कंची, स्वयम कंची, एफपीएआय सोलापूरचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, रोटरी ई-क्लबचे अध्यक्ष संदीप कुलकर्णी, मेडिकल डायरेक्टर प्रकाश पोटाबत्ती, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे कैलास चौधरी, वीरेंद्र परदेशी, सुशांत कुलकर्णी तसेच लॅब टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचे दर्शन पोतदार, स्वप्नील पोतदार, गणेश मादगुंडी, चंद्रकांत जक्कन आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे अध्यक्ष डॉ. अविनाश खांडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

आरोग्य शिबिरात डॉक्टर, परिचारिका, समुपदेशक, फिजिओथेरपिस्ट आणि सामाजिक कार्यकर्ते अशा सुमारे ४० जणांनी सेवाभावाने सहभाग घेतला. तसेच स्वयंसेवकांनी उपस्थित वारकरी व भाविकांना आरोग्यविषयक माहितीपत्रकांचे वाटप केले.

## जनहिताच्या प्रश्नांवर अंतापूरकर आक्रमक

■ जिल्हा नियोजन समितीत प्रशासनाची घेतली झाडाझडती

■ स्मशानभूमी, पाणी टंचाईसह प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याची मागणी

बिलोली : (स. गांवकरी)

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांवर आमदार जितेश अंतापूरकर यांनी प्रशासनाला जाब विचारत जनहिताच्या मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडली. वीजपुरवठा, पीक विमा, अवैध रेती उत्खनन, स्मशानभूमी विकास,पाणी टंचाई प्रश्न तसेच इतर पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी करत पालकमंत्री अतुल सावे यांचे मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नाकडे वेधले लक्ष बैठकीत आ.अंतापूरकर यांनी महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्याचा मुद्दा प्राधान्याने उपस्थित केला. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाने वीज मिळणे, कृषीपंपांना वेळेवर वीज उपलब्ध न होणे आणि तांत्रिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील नागरिक व शेतकरी त्रस्त असल्याचे त्यांनी सांगितले. वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली. पीक विमा योजनेतील हमीपत्राचा त्यांनी मुद्दा उपस्थित केला. गावागावांतील स्मशानभूमींमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आणत रस्ते, संरक्षक भिंती, पिण्याचे पाणी, वीज आणि शेड आदी सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली. अवैध रेती उत्खननामुळे पर्यावरणाची हानी, महसुलाचे नुकसान आणि नागरिकांना होणारा त्रास याकडेही त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. या प्रकारांवर कठोर कारवाई करून संबंधित यंत्रणांनी प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय मतदारसंघातील विविध विकासकामे, रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक सुविधा आणि अन्य प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाने निश्चित कालमर्यादेत कार्यवाही करावी, अशी मागणी अंतापूरकर यांनी बैठकीत केली.

## तुकाराम मुंडे पॅटर्न कळवणला मंजूर नाही का?

■ तालुक्यात भेसळखोर बिनधास्त

■ तालुक्यात अजूनही भेसळखोर बिनधास्त, FDA च्या आदेशाला केराची टोपली

■ मुंडे साहेबांचा धसका फक्त नावाला कळवण मध्ये अजूनही भेसळ आणि बोगस बिसलेरीचा सुळसुळाट



कनाशी : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्यातील अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यात भेसळखोरांविरोधात पुकारलेल्या लढ्याने सर्वत्र खळबळ उडवून दिली आहे. राज्यभरात अनेक दुकानांवर धाडी, लाखोंचा माल जप्त आणि भेसळखोरांची दुकाने सील करण्याची कारवाई सुरू असताना कळवण तालुका मात्र याला अपवाद ठरत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

राज्यात एकीकडे FDA ने कडक कारवाईचा बडगा उगारला असताना, कळवण तालुक्यातील अभोना, कनाशी, जयदर सह परिसरातील अनेक गावांमध्ये अद्यापही भेसळयुक्त पदार्थांची विक्री सर्रासपणे सुरू असल्याचा आरोप आहे. तेल, दूध, मसाले आणि पेयपदार्थांमध्ये भेसळ होत असल्याच्या तक्रारी असूनही स्थानिक प्रशासनाने डोळेझाक केल्याचे दिसून येत आहे. हॉटेल व्यावसायिकांवरही तुकाराम मुंडे यांच्या कारवाईचा कोणताही परिणाम दिसत नाही. काही मोजक्याच हॉटेलधारकांनी धसका घेत हॉटेलमध्ये RO चे पाणी ठेवले आहे. मात्र बहुतांश हॉटेलमध्ये आजही ग्राहकांना पिण्यासाठी बिसलेरी नावाखाली वेगवेगळ्या कंपन्यांचे पाणी दिले जात आहे.

बाजारात बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या बिसलेरी बाटल्यांचा सुळसुळाट झाला असून त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. बहुतांश हॉटेलमध्ये अद्यापही RO फिल्टर बसवण्यात आलेले नाहीत. एका बाजूला राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त स्वतः मैदानात उतरून कारवाई करत आहेत, तर दुसरीकडे कळवण तालुक्यातील संबंधित अधिकारी मात्र शांत आहेत. त्यामुळे हे अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत आहेत का? असा थेट आरोप होत आहे. नागरिकांची मागणी आहे की, तुकाराम मुंडे पॅटर्ननुसार कळवण तालुक्यातही तातडीने तपासणी मोहीम राबवावी, भेसळखोरांवर कडक कारवाई करावी आणि हॉटेलमध्ये RO फिल्टर पाणी बंधनकारक करावे. आता तरी संबंधित प्रशासन जागे होणार का, की कारवाईसाठी आणखी एखादी दुर्घटना घडण्याची वाट पाहणार? याचे उत्तर येणारे काही दिवसच देतील.

## सरसेनापती नेताजी पालकर स्मारकासाठी एक कोटी रुपयांच्या निधीची घोषणा

### तामसा येथील स्मारक उभारणीसंदर्भात पालकमंत्री अतुल सावे यांची सकारात्मक भूमिका

तामसा : (स. गांवकरी)



महाराजांचे पराक्रमी सरसेनापती नेताजी पालकर यांच्या हदगाव तालुक्यातील तामसा येथील ऐतिहासिक समाधी स्थळाचा विकास करून भव्य स्मारक उभारण्यात येणार असून, त्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केली.

तामसा येथील समाधी स्थळाच्या विकासासाठी छावा मराठा संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अतुल सावे यांनी आंदोलकांच्या शिष्टमंडळाशी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात चर्चा केली. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण व मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी तामसा परिसराचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करत स्मारक उभारणीसाठी शासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी केली.

यावेळी शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक सल्लागार समिती, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन व आढावा समिती स्थापन करणे, स्मारकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे तसेच प्रकल्प व्यवस्थापन समिती (पीएमसी) गठीत करण्याबाबत मागणी केली.

शिष्टमंडळाच्या निवेदनाची दखल घेत पालकमंत्री श्री. सावे यांनी स्मारक उभारणीबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून स्मारकाच्या उभारणीस गती देण्यात येईल. तसेच यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार भीमराव केराम, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीस किशोर चव्हाण, डॉ. राजेंद्र दाते पाटील, इंजि. तानाजी हुस्सेकर, कामाजी पवार, सुनंदा जोगदंड, डॉ. प्रभाकर जाधव, दीपक पावडे, दीपक राजुरकर, कैलास शिंदे, बबन पाटील, संजय हंबर्डे, सुनील कदम, दशरथ कपाटे, शिवानंद पाटील, विश्वजीत जाधव यांच्यासह शिवप्रेमी उपस्थित होते..

## मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर

■ प्रारूप मतदार यादी १७ ऑगस्टला, अंतिम यादी १९ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

भारत निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. अलीकडील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मूख्य निवडणूक अधिकारी , महाराष्ट्र राज्य यांनी मुदतवाढीची केलेली विनंती मान्य करून आयोगाने हा निर्णय घेतल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दिली आहे. सुधारित कार्यक्रमानुसार, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटीची मोहीम ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

त्यानंतर १७ ऑगस्ट २०२६ (सोमवार) रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मतदारांकडून दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. तसेच १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नोटिसा देणे, सुनावणी घेणे आणि दावे-हरकतींचा निपटारा करण्याची प्रक्रिया पार पडेल.

यानंतर १९ ऑक्टोबर २०२६ (सोमवार) रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

पात्र नागरिकांनी निर्धारित कालावधीत मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी गणना प्रपत्र भरून देऊन निवडणूक प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर यांनी केले आहे.

# शाळा-महाविद्यालय परिसरातील अवैध व्यवसायांवर आठ दिवसांत धडक कारवाई

### उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर कदम यांचा इशारा



किनवट : (स. गांवकरी)

युवकांना अमली पदार्थ, तंबाखूजन्य पदार्थ व इतर व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी आणि शैक्षणिक परिसर सुरक्षित करण्याच्या उद्देशाने किनवट उपविभागीय पोलिस कार्यालयाच्या वतीने "नशामुक्त किनवट अभियान" हाती घेण्यात येणार असल्याची घोषणा उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी केली आहे. या अभियानाअंतर्गत शाळा व महाविद्यालयांच्या परिसरापासून २०० मीटरच्या अंतरातील अवैध व बेकायदेशीर आस्थापनांवर विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. यासंदर्भात प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओ संदेशात कदम यांनी सांगितले की, शासनाच्या विविध कायदे व नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. येत्या आठ दिवसांचा अवधी संबंधित आस्थापनांना देण्यात येत असून, या कालावधीत त्यांनी स्वतःहून आपल्या व्यवसायाबाबत कायदेशीर निर्णय घ्यावा. त्यानंतर शाळा व महाविद्यालय परिसरात नियमबाह्य पद्धतीने सुरू असलेल्या आस्थापनांवर महसूल, अन्न व औषध प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संबंधित विभागांच्या समन्वयातून कठोर कारवाई केली जाईल. कदम यांनी स्पष्ट केले की, किराणा दुकाने, पानटपऱ्या, चहाचे स्टॉल किंवा इतर कोणतेही व्यावसायिक आस्थापन असो, सर्वांनी शासनाचे नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे. अल्पवयीन विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थ, सिगारेट, गुटखा, ई-सिगारेट, निकोटीनयुक्त उत्पादने किंवा शासनाने प्रतिबंधित केलेल्या कोणत्याही वस्तूंची विक्री आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या मोहिमेदरम्यान आस्थापनांकडे आवश्यक परवाने आहेत का, अन्नपदार्थांची गुणवत्ता, अन्न भेसळ, परवाना अटींचे पालन तसेच इतर कायदेशीर बाबींचीही सखोल तपासणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाईसह आवश्यकतेनुसार आस्थापने बंद करण्याची किंवा अन्य कायदेशीर उपाययोजना करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

'नशामुक्ती किनवट अभियान' केवळ कारवाई पुरते मर्यादित नसून त्यामध्ये जनजागृतीची तितकेच महत्त्व दिले जाणार आहे. पोलिस अधिकारी स्वतः शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. अमली पदार्थांचे दुष्परिणाम, व्यसनाधीनतेमुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक नुकसान, तसेच कायदेशीर परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी कोणतीही संशयास्पद बाब अथवा बेकायदेशीर विक्री निदर्शनास आल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### 'नशामुक्त समाज' घडविण्याचा निर्धार

शाळा-महाविद्यालय परिसर पूर्णपणे व्यसनमुक्त व सुरक्षित ठेवणे, युवकांना व्यसनाच्या विळख्यातून वाचविणे आणि समाजात कायद्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी स्पष्ट केले. शासनाने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रात अथवा प्रतिबंधित वस्तूंची विक्री, साठवण किंवा इतर कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर कृत्य कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नसल्याचा ठाम इशाराही त्यांनी दिला. पोलिस प्रशासनाच्या या उपक्रमामुळे शैक्षणिक परिसर अधिक सुरक्षित होण्यास मदत होईल, तसेच युवकांमध्ये व्यसनमुक्त जीवनशैलीबाबत सकारात्मक संदेश जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सिडको परिसरातील एस आय आर मोहीमेला प्रतिसाद

नवीन नांदेड (स. गांवकरी) : नांदेड मनपा व महसूल प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 19 जुलै रोजी वसंतराव नाईक महाविद्यालय जुनी ईमारत सिडको येथील मतदान केंद्र 195 ते 200 या पाच मतदार केंद्रावरील मतदारांनी गणना पत्र नोंदणी अर्जास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून निवडणूक अधिकारी अविनाश शिनगारे मनपाचे सिडको सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग नगरसेवक राजू पाटील काळे यांच्या सह सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. एस आय आर मोहीमे अंतर्गत 19 जुलै रोजी मनपाच्या प्रभाग क्रमांक 19 मधील मतदान केंद्र 195 ते 200 या पाच मतदार केंद्रावरील मतदारांचे गणना पत्र नोंदणी अर्ज भरून घेण्यात आले या वेळी बिएलओ मालु एनफळे, प्रभु गिराम, रविंद्र पवळे,प्रितम गायकवाड,संजय काचावार, मामिलवाड यांच्या सह ओराळे लक्ष्मी,गिरी संगिता,कोटेपलु सावित्रा, शिंदे विजया, एडके गाथा,जोगदंड अर्चना, चामलवार, वर्षा पाटील यांच्या सहअंगणवाडी मदतनीस,आशा वर्कर्स,व प्रभागाचे नगरसेवक राजू पाटील काळे, भाजपा मंडळ अध्यक्ष सचिन रावका,शितल खांडील यांच्या सह सामाजिक व विविध क्षेत्रातील कार्यरत यांनी सहकार्य केले.

### सोलापूर जिल्ह्यात आदिशक्ती मुक्ताई पालखीचे जल्लोषात स्वागत



सोलापूर (स. गांवकरी) : आदिशक्ती मुक्ताई आषाढी वारी पालखी सोहळा सन २०२६ च्या २६ व्या दिवशी, रविवार (दि. १९ जुलै) पालखी सोहळ्याने सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला. यावेळी वारकरी संप्रदायात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. अशोक महाराज मोरे यांनी आदिशक्ती मुक्ताईचे भावपूर्ण दर्शन घेतले. यावेळी संत मुक्ताई संस्थेचे अध्यक्ष अॅड. रवींद्र भैय्या पाटील तसेच संत मुक्ताई पालखी सोहळा प्रमुख रवींद्र हरणे बाबा महाराज यांच्या हस्ते ह.भ.प. अशोक महाराज मोरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित वारकरी व भाविकांनीही टाळ-मृदंगाच्या गजरात त्यांचे स्वागत केले. यानंतर ह.भ.प. अशोक महाराज मोरे यांनी संत निवृत्तीनाथ महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली, संत सोपानदेव महाराज, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज तसेच जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे दर्शन घेत वारकरी परंपरेप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. सोलापूर जिल्ह्यातील प्रवेशामुळे पालखी सोहळ्याला अधिक भक्तिमय वातावरण लाभले असून, "ज्ञानोबा-तुकाराम" आणि "मुक्ताई माऊली"च्या जयघोषात हजारो वारकरी विठ्ठलनामाचा अखंड गजर करत पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत. आदिशक्ती मुक्ताई पालखी सोहळा वारकरी संप्रदायातील भक्ती, समता आणि संत परंपरेच्या अखंड वारशाचे दर्शन घडवत पुढे सरकत आहे.



### रजनी दारवटकर यांचे निधन

पुणे (स. गांवकरी) : जनता वसाहत येथील रहिवासी रजनी नंदकुमार दारवटकर (वय ७६ वर्ष) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा सागर दारवटकर, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दारवटकर या भारतीय जैन संघटना (बीजेएस) संस्थेतील वरिष्ठ व्यवस्थापक प्रशांत पितालिया यांच्या सासू होत्या.



### गोविंद वैजापुरकर यांचे निधन

वडाळा महादेव (स. गांवकरी) : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील ज्येष्ठ पत्रकार गोविंद वैजापूरकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे मृत्यू समयी त्यांचे ८४ वर्षे वय होते त्यांच्या पश्चात पत्नी मुली पाच मुलगा एक नातवंडे जावई असा मोठा परिवार आहे वैजापूर चे माजी आमदार सावळेराम त्रिभुवन ( वैजापूरकर ) यांचे ते पुतणे होत.



### डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी

वडाळा महादेव (स. गांवकरी) : श्रीरामपूर तालुक्यातील अशोकनगर येथे तसेच निपाणी वडगाव ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली. निपाणी वडगाव ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच सौ. सविता योगेश देवकर यांच्या हस्ते डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच अशोकनगर येथे भागचंद नवगिरे यांच्या हस्ते डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याचा गौरव करत, त्यांनी आपल्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि लोकनाट्यांच्या माध्यमातून वंचित, शोषित व कष्टकरी समाजाला आवाज दिला तसेच सामाजिक समता, न्याय आणि मानवतेचा संदेश जनमानसात रुजवला, असे सांगितले. डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असून, त्यांनी दिलेला समतेचा, स्वाभिमानाचा आणि संघर्षाचा संदेश प्रत्येकाने आचरणात आणावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी उपस्थित भागचंद नवगिरे, योगेश देवकर, डॉली उमप यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अन्नत्याग आंदोलनाच्या पाचव्या दिवशी शिवसेनेचा जाहीर पाठिंबा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घडवून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन

नाशिक : (स. गांवकरी)




नाशिक रिंग रोड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आमरण अन्नत्याग आंदोलनाच्या पाचव्या दिवशी शिवसेना पक्षाने आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत शेतकऱ्यांच्या मागण्या सोडविण्यासाठी सक्रिय भूमिका घेण्याचे आश्वासन दिले. आज आंदोलनस्थळी शिवसेना पक्षाचे उपनेते तथा नाशिक जिल्हाप्रमुख अजय दादा बोरस्ते आणि उपमहापौर विलास अण्णा शिंदे यांनी भेट देऊन करण गायकर व रिंग रोड बाधित शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.यावेळी शेतकऱ्यांनी रिंग रोड प्रकल्पासंदर्भातील अन्यायकारक भूसंपादन प्रक्रिया,अलाइनमेंटमधील बदल,बाजारभावानुसार योग्य मोबदला,घरे,विहिरी, बोअरवेल,फळबागा आणि शेतीचे होणारे नुकसान याबाबतची माहिती संबंधित कागदपत्रे व पुराव्यांसह त्यांच्यासमोर मांडली. तसेच शेतकऱ्यांच्या वतीने त्यांच्या मागण्यांचे सविस्तर निवेदनही शिवसेना पदाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी अजय दादा बोरस्ते आणि विलास अण्णा शिंदे यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त करत सांगितले की,शिवसेना पक्षाच्या वतीने पुढील दोन दिवसांत उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या सर्व न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्यांनी सांगितले की,उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशीही या विषयावर दूरध्वनीद्वारे चर्चा करण्यात आली असून, शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ दिला जाणार नाही.शासन स्तरावर समन्वय साधून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना पक्ष प्रामाणिकपणे प्रयत्न करेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी पुढे सांगितले की,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नेतृत्व असून, शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी ते निश्चितच सकारात्मक भूमिका घेतील. त्यामुळे या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा निघेल,अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. चर्चेदरम्यान शेतकऱ्यांनी यापूर्वी एमएसआरडीसीच्या माध्यमातून प्रस्तावित करण्यात आलेली रिंग रोडची अलाइनमेंट बहुतांश शेतकऱ्यांना मान्य होती,मात्र त्यानंतर प्रकल्पाच्या नियोजनात बदल करून नवीन प्राधिकरणामार्फत करण्यात आलेल्या अलाइनमेंटमुळे अनेक शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचे दस्तऐवज व पुराव्यांच्या आधारे निदर्शनास आणून दिले.या बदलामुळे मोठ्या प्रमाणावर शेती,घरे, विहिरी,बोअरवेल आणि फळबागांचे नुकसान होणार असल्याची भूमिका शेतकऱ्यांनी मांडली. शिवसेना पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांनी सादर केलेल्या माहितीची गंभीर दखल घेत शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. यावेळी करण गायकर यांनी स्पष्ट भूमिका मांडताना सांगितले की,रिंग रोड बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आणि शासनाकडून अधिकृत लेखी निर्णय होत नाही, तोपर्यंत आमरण अन्नत्याग आंदोलन सुरूच राहील. हा संघर्ष कोणत्याही व्यक्ती किंवा पक्षाविरोधात नसून शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आहे."

दरम्यान,आंदोलनाच्या पाचव्या दिवशी उपोषणकर्ते विनोद कातड यांची प्रकृती गंभीरपणे खालावल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच करण गायकर यांचीही प्रकृती खालावत असल्याचे वैद्यकीय तपासणीत आढळून आले.डॉक्टरांच्या पथकाने त्यांना तातडीने उपचार घेण्याचा सल्ला दिला.मात्र, "जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत मी कोणतेही वैद्यकीय उपचार स्वीकारणार नाही. आधी शेतकऱ्यांना न्याय द्या, नंतर उपचार घेईन,अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली.

## मोदी सरकार 'संविधानविरोधी'

पुणे : (स. गांवकरी)



- एनडीएतील मित्रपक्षांनी वेळीच बोध घ्यावा – गोपाळदादा तिवारी
- शिक्षणमंत्र्यांना वाचवण्याच्या प्रयत्नातून सरकारचा चेहरा उघड झाल्याची काँग्रेसची टीका; आंदोलन दडपल्याचा आरोप

केंद्रातील मोदी सरकारच्या कारभारातून संविधानिक आणि लोकशाही मूल्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा वारंवार प्रत्यय येत असून, राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षांनी सरकारच्या कार्यपद्धतीचा वेळीच आणि गांभीर्याने बोध घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केले आहे. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. लडाखमधील पर्यावरणवादी सामाजिक कार्यकर्ते आणि वैज्ञानिक संशोधक सोनम वांगचुक यांनी नीट प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकरण आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर संबंधित शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी आंदोलन सुरू केले होते. दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या १९ दिवसांपासून लोकशाही आणि अहिंसेच्या मार्गाने शांततेत सुरू असलेले हे सत्याग्रह आंदोलन केंद्र सरकारने उच्च न्यायालयाचे कारण पुढे करत पोलिसांच्या माध्यमातून दडपल्याचा आरोप तिवारी यांनी प्रसिद्धी निवेदनाद्वारे केला आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या पुणे विभागीय उपाध्यक्षपदी

## संत साहित्यिक प्रा. डॉ. रामकृष्णा महाराज पाटील यांची नियुक्ती

आळंदी : (स. गांवकरी)

**निवडीचे विभागात स्वागत ; अभिनंदनाचा वर्षाव**



रावेत (पुणे) येथील राज्यशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक,संत साहित्याचे अभ्यासक, अध्यात्मिक ग्रंथांचे लेखक, महाराष्ट्रातील संतपरंपरेवर विपुल लेखन करणारे अभंग चरित्रकार, कथाकार, कादंबरीकार, कवी तसेच अनेक पुरस्कारांनी सन्मानित साहित्यिक विद्यावाचस्पती प्रा. डॉ. रामकृष्णा महाराज पाटील यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या पुणे विभागीय उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. शुभांगीताई काळभोर यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले असून, या नियुक्तीचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत राहणार आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत परिषदेने प्रा. डॉ. रामकृष्णा महाराज पाटील यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन, संतवाङ्मयाचा प्रसार, अध्यात्मिक मूल्यांची जोपासना आणि नवोदित साहित्यिकांना प्रेरणा देण्याचे त्यांचे कार्य राज्यभर गौरविले गेले आहे.

प्रा. डॉ. रामकृष्णा महाराज पाटील हे सुमारे दीडशेहून अधिक ग्रंथांचे लेखक असून संत साहित्य, अध्यात्म, चरित्र, कथा, कादंबरी, कविता आणि वैचारिक लेखन अशा विविध साहित्यप्रकारांत त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. महाराष्ट्रातील संतांच्या जीवनकार्याचा अभ्यास करून त्यांनी संतांच्या अभंग चरित्रलेखनातून मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

या नियुक्तीमुळे पुणे विभागात साहित्य परिषदेचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात समाजापर्यंत पोहोचविणे, साहित्यिक चळवळींना चालना देणे तसेच सुसंस्कारित आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी साहित्याचा प्रभावी वापर करण्यास बळ मिळेल, असा विश्वास साहित्यप्रेमी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी व्यक्त केला आहे. प्रा. डॉ. रामकृष्णा महाराज पाटील यांच्या या निवडीबद्दल साहित्य, सामाजिक, शैक्षणिक आणि अध्यात्मिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आळंदी जनहित फाउंडेशन तर्फे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, अध्यक्ष राजेंद्र घुंडरे पाटील यांनी ही संस्थेचे अभिनंदन केले.

## विद्यापीठ परिसर हरित, पर्यावरणपूरक करण्यासाठी शासन कटिबद्ध

नाशिक : (स. गांवकरी)

**कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन**




नाशिकला स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि हरित शहर म्हणून विकसित करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'उन्नत नाशिक' अभियानांतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्र परिसराला आदर्श ग्रीन कॅम्पस म्हणून विकसित करण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल.

विद्यापीठ परिसर हरित व पर्यावरणपूरक करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच लावलेल्या वृक्षांचे संवर्धन आणि संगोपन करण्यावर भर दिला जाईल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा व कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्र, मौजे शिवनई, ता.दिंडोरी येथे आयोजित 'मिशन ग्रीन मान्सून' अभियानांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महापौर हिमगौरी आडके, आमदार गोकुळ गिते, ,विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. पराग काळकर, पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस स्वामी, सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सागर वैद्य, बागेश्री मांडाळकर, महानगरपालिका स्थायी समितीचे सभापती मच्छिंद्र सानप, नगरसेवक सुधाकर बडगुजर, माजी स्थायी समिती सदस्य गणेश गिते, माजी आमदार अपूर्व हिरे यांच्यासह प्राध्यापक, नाशिक मधील विविध शिक्षण संस्थांचे विद्यार्थी, स्वयंसेवक, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) चे विद्यार्थी आणि पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते. मंत्री महाजन म्हणाले की, या अभियानाअंतर्गत विद्यापीठ परिसरात 62 एकर परिसरात सुमारे दिड हजार देशी वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जाते, यावर्षी लावलेली झाडे टिकविण्यासाठी वृक्षसंवर्धनावर अधिक भर देण्यात आला आहे. 'मिशन ग्रीन मान्सून' अंतर्गत ८ ते १० फूट उंचीची मोठी वृक्षरोपे आणून नियोजनबद्ध पद्धतीने त्यांची लागवड करण्यात आली. प्रत्येक वृक्षासाठी संरक्षक व्यवस्था, नियमित पाणी, देखभाल आणि स्थानिक नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्यात आला असून, ही झाडे शंभर टक्के सुरक्षित रहावी यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. केवळ झाडे लावणे पुरेसे नसून ती वाढविणे आणि त्यांचे संगोपन करणे हीच पर्यावरण संवर्धनाची खरी जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. नाशिक शहर अधिक हरित करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पाच लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या सहभागातून ते यशस्वी करण्याचा मानस आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या 'उन्नत नाशिक' अभियानांतर्गत शहर व परिसर अधिक हिरवागार करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'मिशन ग्रीन नाशिक' उपक्रमाअंतर्गत दऱ्याई माता देवस्थान परिसरात राज्याचे जलसंपदा व कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## किआ इंडियाने सिरोस ईव्ही सादर केली आहे

नाशिक : (स. गांवकरी)

भारतातील आघाडीची मास-प्रीमियम ऑटोमोबाईल उत्पादक कंपनी किया इंडियाने आज आपली दुसरी मास-मार्केट इलेक्ट्रिक एसयूव्ही, सिरियस ईव्ही सादर केली आणि ₹२५,००० मध्ये प्री-बुकिंग सुरू झाल्याची घोषणा केली. ग्राहक किया इंडियाच्या वेबसाइटवरून आणि देशभरातील अधिकृत डीलरशिप्सवर बुकिंग करू शकतात. सिरियस ईव्ही, ५२६ किमीच्या सेगमेंटमधील सर्वोत्तम एआरएआय-प्रमाणित रेंजसह, इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार करण्यामधील प्रमुख आव्हानांना तोंड देण्यासाठी डिझाइन केलेल्या ओनरशिप पॅकेजसह येते. यामध्ये लाईफटाईम* हाय-व्होल्टेज बॅटरी वॉरंटी, अॅश्युअर्ड बायबॅक प्रोग्राम आणि बॅटरी-अॅज-अ-सर्व्हिस (BaaS) यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश आहे. आजच्या भारतीय ईव्ही ग्राहकांना केवळ जास्त रेंजच नव्हे, तर सुलभ चार्जिंग, स्मार्ट तंत्रज्ञान, सुधारित कनेक्टिव्हिटी आणि दीर्घकाळ टिकणारा, विश्वासार्ह मालकीचा अनुभव यांचीही अपेक्षा आहे. या गरजा लक्षात घेऊन सिरोस ईव्ही विकसित करण्यात आली आहे, ज्यात मजबूत एसयूव्ही डिझाइन, अत्याधुनिक तंत्रज्ञान, सेगमेंटमधील अग्रगण्य वैशिष्ट्ये आणि उच्च पातळीची सुरक्षा यांचा मेळ घातला आहे. किया इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ, श्री. ग्वांगगु ली म्हणाले, “आमची ‘प्रेरणादायी हालचाल’ (Movement that Inspires) ही संकल्पना भविष्यातील गतिशीलतेला अधिक अर्थपूर्ण, सुलभ आणि प्रेरणादायी बनवण्यावर आधारित आहे. सिरोस ईव्हीच्या माध्यमातून, आम्ही अत्याधुनिक इलेक्ट्रिक मोबिलिटी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवत आहोत.

# शाळा क्र. ४ जवळ ३ किलो गांजासह १० लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

## दोन आरोपी फरार : रात्रगस्तीवरील पोलिसांच्या सतर्कतेमुळे कारवाई; एका आरोपीला अटक, तीन दिवसांची पोलीस कोठडी

जुन्नर : (स. गांवकरी)




जुन्नर शहरातील अहिल्यादेवी होळकर शाळा क्र. ४ जवळील मैदानात पोलिसांनी छापा टाकून सुमारे ३ किलो गांजासह एक चारचाकी व दुचाकी असा एकूण १० लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून दोन आरोपी फरार झाले आहेत. पोलिसांकडून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

ही कारवाई १९ जुलै २०२६ रोजी रात्री करण्यात आली. पोलीस हवालदार हांडे, पोलीस शिपाई बापू वाघमोडे आणि पोलीस शिपाई अमोल सातपुते हे जुन्नर शहर परिसरात रात्रगस्त घालत होते. त्यावेळी अहिल्यादेवी होळकर शाळा क्र. ४ येथील मैदानात एक चारचाकी आणि एक दुचाकी संशयास्पदरीत्या उभी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. रात्रगस्तीवरील पोलीस पथकाला संशय आल्याने त्यांनी तत्काळ जुन्नर पोलीस ठाण्यात याबाबत माहिती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या आदेशानुसार सहायक पोलीस निरीक्षक संदीप मोरे, पोलीस हवालदार महेश भालेराव, पोलीस शिपाई दादा पावडे, कैलास केंद्रे, शंभू निरडे आणि अजय इंगोले यांच्या पथकाने घटनास्थळी छापा टाकला. पोलिसांनी आरोपी मयूर संजय खराडे याच्या ताब्यातील टोयोटा कंपनीच्या इनोव्हा (क्र. एमएच १२ ईके ३९११) या चारचाकी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये २ किलो ६६ ग्रॅम गांजा आढळून आला. तसेच घटनास्थळावरून फरार झालेल्या आरोपींच्या दुचाकीमध्ये ९६२ ग्रॅम गांजा सापडला. अशा प्रकारे पोलिसांनी एकूण ३ किलो २८ ग्रॅम गांजा जप्त केला. या कारवाईत गांजासह वाहने मिळून एकूण १० लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी गुन्हा नोंद क्रमांक २३१/२०२६ अन्वये गुंगीकारक औषधी आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ मधील संबंधित कलमांसह भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील दोन आरोपी फरार असून त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास जुन्नर पोलीस करीत आहेत.






महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 | सोमवार दि. २० जुलै २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी








संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २२० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# जनतेच्या प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्याची ग्वाही

## राहता येथे डॉ. सुजय विखे पाटील यांचा जनता दरबार संपन्न

राहता (समर्थ गांवकरी)





जनतेच्या समस्या थेट ऐकून त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने राहता नगरपालिकेच्या सभागृहात भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. यावेळी राहतातालुक्यातील व शहरातील नागरिकांनी विविध नागरी सुविधा, विकासकामे तसेच वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाच्या अडीअडचणी निवेदनाद्वारे डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासमोर मांडल्या.

जनता दरबारात प्रत्येक नागरिकाची समस्या संयमाने ऐकत डॉ. सुजय विखे पाटील यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा केली. तातडीने मार्गी लावता येणाऱ्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देतानाच उर्वरित प्रश्नही प्राधान्याने सोडविण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. जनतेच्या प्रत्येक प्रश्नाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना दिली.

याप्रसंगी राहता नगरपरिषदेचे नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी लोंढे, विविध विभागांचे अधिकारी तसेच भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनता दरबारात पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वीज, नागरी सुविधा, शासकीय योजनांचा लाभ तसेच स्थानिक विकासाशी संबंधित विविध प्रश्न नागरिकांनी मांडले. प्रत्येक निवेदनाची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना वेळेत कार्यवाही करून नागरिकांना दिलासा देण्याच्या सूचना डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिल्या.

नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्याचा हा उपक्रम प्रशासन आणि जनतेतील समन्वय अधिक बळकट करणारा ठरल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

# महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय होणार, कोकणात ४८ तासांत पाऊस पडणार

**मुंबई :** मागील दीड महिन्यात महाराष्ट्रात सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. आता राज्यात पुन्हा एकदा पावसासाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली चक्राकार वाऱ्यांची स्थिती, अरबी समुद्रातील वाढलेला वाऱ्याचा वेग आणि वातावरणातील वाढलेली आर्द्रता यामुळे पुढील काही दिवस राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विशेषतः घाटमाथा, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून, खरीप हंगामातील पिकांसाठी हा पाऊस दिलासादायक ठरणार आहे.

गेल्या वीस दिवसांपासून राज्यातील अनेक भागांत पावसाने विश्रांती घेतल्याने शेतकरी चिंतेत होते. सोयाबीन, कापूस आणि इतर खरीप पिकांना पाण्याअभावी फटका बसत होता. काही भागांत दुबार पेरणीची वेळही आली होती. मात्र आता वातावरणात झालेल्या बदलामुळे पावसासाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या आहेत.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन दिवस मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुणे घाटमाथ्यावरही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. रविवारी पुणे, अहिल्यानगर, बीड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांसाठी पिवळा इशारा जारी करण्यात आला आहे. तसेच वाशीम, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांनाही येलो अलर्ट देण्यात आला आहे. सोमवारी मराठवाड्यातील काही भागांत हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, त्यानंतर २१ जुलै रोजी रायगड, पुणे आणि नाशिकच्या घाटमाथ्यावर तर २२ जुलै रोजी रत्नागिरी, रायगड, पालघर, नाशिक आणि पुणे परिसरात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे.

# शैक्षणिक उन्नतीसाठी ॲड. संजय काळे यांचे दिशादर्शक योगदान : निवृत्ती काळे यांचे प्रतिपादन





जुन्नर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड.संजय शिवाजी काळे यांचे विद्यार्थ्यां च्या शैक्षणिक उन्नतीसाठी दिशादर्शक योगदान असल्याचे प्रतिपादन संस्था उपाध्यक्ष निवृत्ती काळे यांनी केले ते म्हणाले,उच्चविद्या विभूषित असलेले संजय शिवाजी काळे हे जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती,पुणे जिल्हामध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून देखील उल्लेखनीय कार्य करत आहेत त्यांच्या वाढदिवसानिमित महाविद्याल यामध्ये विविध वृक्ष लागवड करण्यात आली याद्वारे पर्यावरणीय महत्व विद्यार्थ्यां मध्ये रुजविणे अशा उपक्रमां मुळे साध्य होत आहे अनाथ व गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करूनविद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचे ग्राहक भांडाराचे कार्य स्पृहणीय असल्याचे त्यांनी नमूद केले . करण्यात आले.

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव दत्तात्रय थोरात,संस्थेचे सहसचिव सुभाषराव कवडे,खजिनदार कांताबाई मस्करे,संस्थेचे विश्वस्त ड अविनाशजी थोरवे,विश्वस्त अशोकशेठ काळे,अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.विलास कुलकर्णी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव वाघमारे, उपप्राचार्य डॉ.रवींद्र चौधरी, समन्वयक व उपप्राचार्य प्रा. प्रतिभा लोढा,पर्यवेक्षक प्रा. समीर श्रीमंते,एमसीव्हीसी विभाग प्रमुख प्रा कुंडलिक नेटके,श्री शिव छत्रपती महाविद्यालयीन विद्यार्थी ग्राहक संस्थेचे सभापती डॉ विनायक लोखंडे, प्रबंधक व सचिव मनीषा कोरे,प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यावेळी उपस्थित होते प्रास्ताविक श्री शिव छत्रपती महाविद्यालयीन विद्यार्थी सहकारी ग्राहक संस्थेचे सभापती डॉ. विनायक लोखंडे यांनी तर सुत्रसंचालन आणि आभार प्रा निलेश आमले यांनी मानले.

# भरपावसात उपमुख्यमंत्री शिंदे पंढरपुरात; वारकऱ्यांशी साधला संवाद



सोलापूर (समर्थ गांवकरी)

आगामी आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज भरपावसात पंढरपूर येथे दाखल झाले. वारीसाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेत त्यांनी गोपाळपूर येथील दर्शन रांगेत उभ्या असलेल्या वारकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या सुविधा आणि अडचणी जाणून घेतल्या.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पावसाची पर्वा न करता वारी मार्गावरील विविध सुविधा, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सेवा आणि गर्दी नियोजनाची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रशासनाच्या तयारीची माहिती घेतली तसेच वारकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. मुख्यमंत्री असताना सुरू केलेली आषाढी वारीच्या पूर्वतयारीचा प्रत्यक्ष आढावा घेण्याची परंपरा उपमुख्यमंत्री झाल्यानंतरही एकनाथ शिंदे यांनी कायम ठेवली आहे. यंदाही त्यांनी प्रत्यक्ष पंढरपुरात येऊन वारी व्यवस्थेचा आढावा घेत प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या. या दौऱ्यादरम्यान मंत्री तानाजी सावंत, मंत्री योगेश कदम, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि विविध विभागांचे पदाधिकारी उपस्थित होते. आगामी आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांसाठी सुरळीत, सुरक्षित आणि सुविधायुक्त व्यवस्था सुनिश्चित करण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# एसआयआर नंतर मतदार यादीतून नाव हटलं तरी नागरिकत्व रद्द होत नाही!

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली :** विशेष सघन पुनरिक्षण (SIR) प्रक्रियेनंतर एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळले गेले, तरी त्यामुळे त्या व्यक्तीचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येत नाही, असे अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

नागरिकत्वाचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे नसून तो कायद्यानुसार सक्षम प्राधिकरणाकडेच असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.



१३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत सर्वोच्च न्यायालयाने घटनात्मक अधिकार, निवडणूक प्रक्रिया, नागरिकत्व, मालमत्ता, वारसा, खाणकाम आणि करार कायद्याशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. या निकालांमधून विविध कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत न्यायालयाने स्पष्ट भूमिका मांडली आहे.

SIR प्रक्रियेबाबत काय म्हणाले न्यायालय?

न्यायालयाने स्पष्ट केले की, SIR प्रक्रियेनंतर मतदार यादीतून नाव वगळले जाणे आणि नागरिकत्व गमावणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत नसल्याने तो भारतीय नागरिक नाही, असा निष्कर्ष काढता येणार नाही.

नागरिकत्वाबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नसल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. याचवेळी SIR प्रक्रियेनंतर नाव वगळलेल्या नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या अपील प्रक्रियेबाबत दाखल याचिकेवरही न्यायालयात सुनावणी झाली.

# बाबुरावजी तिडके यांनी इतरांच्या जीवनात आनंद पेरला : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर (समर्थ गांवकरी)



उमद्या व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेल्या बाबुरावजी तिडके यांनी नेहमीच जनसामान्यांचा विचार केला. इतरांच्या जीवनात आनंद पेरण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांची संख्या मोठी आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबुरावजी तिडके यांना आदरांजली वाहिली.

ज्येष्ठ काँग्रेस नेते बाबुरावजी तिडके यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी चिटणवीस सेंटर येथे सर्वपक्षीय सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. आपल्या वडिलांशी तिडके यांची घनिष्ठ मैत्री होती असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पक्षाच्या पलिकडे मैत्री जपण्याचा त्यांचा स्वभाव होता. सहकाराच्या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय काम केले. आपला साखर कारखाना अडचणीत आला त्यावेळी तो वाचावा, कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत देता यावे, यासाठी गृहलक्ष्मीचे दागिने त्यांनी तारण ठेवले. इतकी कळकळ त्यांच्यात होती.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, दिवंगत तिडके हजरजबाबी होते. भूविकास बँकेचे अध्यक्ष म्हणून काम करताना शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांनी सोडविल्या. संबंधांमध्ये त्यांनी कधी पक्ष येऊ दिला नाही.

दिवंगत तिडके यांचे कार्य सहकार, शिक्षण, सामाजिक अशा क्षेत्रातील मार्गदर्शक होते, असे सांगून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी समाजाप्रती कळकळ असलेल्या या नेत्याचा जीवन प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन बाळ कुलकर्णी यांनी केले.

# अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची इस्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

संगमनेर (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व सौ.शरयूताई देशमुख यांच्या संकल्पनेतून अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल मधील विद्यार्थ्यांनी सी व्ही रमन परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केल्याने दोन विद्यार्थ्यांची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे तर जवाहर नवोदय व जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेतही स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवले असल्याची माहिती प्राचार्य सौ.जे.बी.सेटी यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना प्राचार्य सौ.सेटटी यांनी सांगितले की, अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल मधील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जिज्ञासा वाढवण्यासाठी सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. राज्य पातळीवरील विज्ञान विषयक असलेल्या सी व्ही रमन परीक्षमध्ये विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यापैकी पाचवी मधील विद्यार्थिनी अनन्या विशाल मोरे यांनी या परीक्षेमध्ये ८० टक्के गुण मिळवले तर सातवी मधील शिकत असलेल्या विराज जयराज हिरे यांनी ७२% टक्के गुण मिळून तालुक्यात तिसरा क्रमांक प्राप्त केला. जवाहर नवोदय निवड चाचणी मध्ये श्रावणी किशोर खेमनर हिची निवड झाली आहे. जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती परीक्षमध्ये सर्वज्ञा सुभाष यादव हिने ७६.५१ टक्के गुण मिळत जिल्ह्यात २१ वा तर अन्वी सिताराम कवडे ७३.१५ टक्के गुण प्राप्त करून जिल्ह्यात २५ वा क्रमांक पटकावला आहे. या दोघांचीही इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. या अंतर्गत त्यांना इस्त्रो मधील विविध संशोधन केंद्रांची माहिती मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन संशोधन वृत्ती आणि नवनिर्मिती विकसित करण्यासाठी या उपक्रमाचा नक्कीच लाभ होणार आहे. तर जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेतून या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे आणि जवाहर नवोदय विद्यालयाच्या परीक्षेतही विद्यार्थ्यांचे मोठे यश ठरणार आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षण व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ.शरयूताई देशमुख, डॉ.जयश्रीताई थोरात, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे व्यवस्थापक प्रा.व्ही.बी.धुमाळ, प्राचार्य सौ.जे.बी.शेठी यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# सत्तेच्या साठमारीला ग्रामस्थांचा लगाम

## राजूरमध्ये भ्रष्टाचाराविरोधात ऐतिहासिक ग्रामसभा, कामचुकारांवर कारवाईची मागणी!

राजूर (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या राजूर गावात सत्ताधारी व विरोधकांमधील वाद, ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचार आणि विकासकामांतील दिरंगाईला कंटाळून ग्रामस्थांनी स्वतःहून पुढाकार घेत ऐतिहासिक जाहीर ग्रामसभा आयोजित केली. ग्रामपंचायतीने अधिकृत ग्रामसभा घेण्याचे टाळल्याने आपलं गाव, आपली जबाबदारी या भावनेतून नागरिकांनी एकत्र येत गावाच्या विविध प्रश्नांवर थेट चर्चा करून प्रशासनाला जाब विचारला.

ग्रामसभेत १४ जुलै २०२६ रोजी तत्कालीन गटविकास अधिकारी विकास चौरे यांच्याकडे करण्यात आलेल्या पत्रव्यवहारानंतरही जबाबदाऱ्या पार न पाडणाऱ्या व कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा ठराव ग्रामस्थांनी एकमुखाने मंजूर केला. ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहार, पदाचा गैरवापर आणि राजकीय संघर्षामुळे गावातील विकासकामे ठप्प झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. यापूर्वी २९ मे २०२६ रोजी झालेल्या ग्रामसभेत संपूर्ण ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा ठरावही ग्रामस्थांनी मंजूर केला होता. त्यावेळी उपसरपंच संतोष बनसोडे यांनी सार्वजनिकरित्या राजीनाम्याची घोषणा केली होती. मात्र त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी यावेळी केला.

ग्रामसभेत केंद्र व राज्य शासनाच्या जल जीवन मिशन योजनेवरही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही गावातील नळपाणी योजना सुरू झाली नसल्याने नागरिकांना अद्याप पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

सभेचे अध्यक्षस्थान किरण माळवे यांनी भूषविले, तर अविनाश बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष मुतडक यांनी आपल्या भाषणातून ग्रामपंचायत पदाधिकारी व संबंधित यंत्रणेवर टीका करत गावातील प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली. माजी उपसरपंच काशिनाथ भडांगे यांच्यासह रोहिदास लहामगे, गौतम पवार, विजय पवार, जीवन रणमाळे, सचिन मुतडक, यशोनंद चोथवे, मयूर कानकाटे, अनिल माळवे तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक व शेकडो युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामसभेला विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते. त्यांनी सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा सादर केला. यावेळी तुंबलेल्या गटारी, खड्डेमय रस्ते, कचऱ्याचे ढीग, बंद स्ट्रीटलाईट आणि वाढते अतिक्रमण यांसारख्या प्रश्नांवर ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागासह संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले. आता आश्वासने नकोत, प्रत्यक्ष कामे दिसली पाहिजेत; अन्यथा ग्रामस्थ तीव्र आंदोलन करतील, असा इशाराही नागरिकांनी दिला. शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेल्या या ग्रामसभेत प्रथमच गावाच्या मूलभूत प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. यापुढे ग्रामपंचायतीच्या कामकाजावर जनतेचा थेट अंकुश राहील आणि गावाच्या विकासासाठी नागरिक संघटितपणे पुढाकार घेतील, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## जन्मदशा



तुमचा मुलगा अंग काठीने वाढला,
असा निरोप शाळा मास्तरांनी घरी
धाडला, आईबाप आमचे अडाणी, गावात
फक्त मास्तरची टाळकीच शहाणी,
जरी संपले नाही बालपणाचे वय,
मास्तरने केली नाही आमची गय,
मास्तरच अख्ख्या गावात ज्ञानी,
ऐका आमच्या जन्मतारखेची कहानी,
मास्तरांनीच पोरांची जन्म तिथी काढली,
सर्वांना जन्माची तारीख १ जूनच
वाढली,
आम्ही सर्व विद्यार्थी एकाच दिवशी
जन्माला आलो,
आणि वय भाऊ म्हणूनआनंदाने धन्य
झालो,
सोयरीकिला सासरचे विचारायचे फक्त
आमचे जन्म वर्ष,
त्यामुळे मनात व्हायचा वेगळाच हर्ष,
आमच्या जन्मतारखेने केला असा
उत्कर्ष,
लोक म्हणायचे असं कसं साला ? हा
काय चमत्कार झाला ?
अख्खा वर्ग एकाच दिवशी जन्माला कसा
आला ?, वाढदिवसाचा केक थोडा सुद्धा
नाही उरला,
अख्या वर्गाला एकच केक पुरला,
मोठे झाल्यावर जन्माच्या तारखेने आमचे
उडाले होश,
परंतु यात आमचा काहीच नाही दोष,
तरी आमच्यावर नियतीचा रोष,
तारखेच्या घोटाळ्याने आम्ही सम जन्मी
मारतोत सरकारी कार्यालयात चकरा ,
जन्म तारखेच्या पश्चातापाने मारतो
भिंतीला टकरा,
चकरा मारल्याने गळतात अंगातून
घामाच्या धारा, पण सरकारच्या नजरेत
आम्हाला नाही अजिबात थारा,
सत्रा मागून जातात सत्र, मिळत नाही
आम्हाला शासकीय जन्म प्रमाणपत्र,
थकून थकून जन्म बंधू शासकीय
कार्यालयाचे पायऱ्यावर बसतात,
आणि कार्यालयातील लोक आमच्याकडे
पाहून मिश्किलपणे हसतात, जन्माच्या
त्रासाने उडवली आमची भूक,
तुम्ही सांगा मित्रांनो यात काय आमची
चूक ?,
जरी आमची जन्मतारीख असली फेक,
तरी विकतात त्या दिवशी अख्ख्या
महाराष्ट्रातील सर्व बेकऱ्यांचे केक,
ही आमच्या जन्माची दशा,
चूक नसताना आम्ही मारतो ऊठ बश्या

**कवी रऊफ समद शेख,**
**सेवानिवृत्त पी.एस.आय., मोबाईल नंबर ९८ २२ ९० ७८ ६९**

# सह्याद्री व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वृक्षारोपण; 'एक विद्यार्थी-एक झाड'चा संकल्प!

राजूर (समर्थ गांवकरी)



पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून रुजावी, या उद्देशाने अभिनव शिक्षण संस्था, अकोले संचलित सह्याद्री व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल, राजूर येथे क्टिव्हिटी फन डे अंतर्गत वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. झाडे लावा, झाडे जगवा आणि एक विद्यार्थी-एक झाड हा संदेश देत विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

या उपक्रमासाठी पर्यावरणप्रेमी राहुल राऊत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी रमेश लेंभे, दत्ता कोंडार, शाळेच्या प्राचार्या सौ. स्मिता पराड, शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी राहुल राऊत यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणातील अनन्यसाधारण महत्त्व, वाढते प्रदूषण रोखण्यासाठी वृक्षलागवडीची आवश्यकता आणि झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी शाळेला विविध वृक्षांची रोपे भेट देऊन पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला हातभार लावला.

यानंतर विद्यार्थी, शिक्षक व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने लावलेल्या रोपाचे नियमित संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

पर्यावरणाबद्दलची जाणीव, निसर्गप्रेम आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ जुलै रोजी पुण्यात राज्यस्तरीय कृषी व पशुधन प्रदर्शन : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई (समर्थ गांवकरी)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ जुलै २०२६ रोजी कृषी महाविद्यालय, पुणे येथे राज्यस्तरीय कृषी व पशुधन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पुढील ऑगस्टमध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात प्रदर्शनाची सांगता होणार आहे. या प्रदर्शनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार उपस्थित राहणार आहेत. हे कृषी प्रदर्शन राज्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि मूल्यवर्धित शेतीचा प्रभावी मेळावा ठरेल, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, या प्रदर्शनात राज्यभरातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), कृषी उद्योजक, संशोधक, कृषी विद्यापीठे तसेच विविध शासकीय संस्थांचा सहभाग असेल. आधुनिक शेतीतील तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर, नैसर्गिक व सेंद्रिय शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, पूरक व्यवसाय, पशुधन विकास, तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी उपयुक्त नवकल्पनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा या प्रदर्शनाचा उद्देश आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल.

प्रदर्शनामध्ये कृषी विभाग, कृषी विद्यापीठे, महाबीज, स्मार्ट प्रकल्प, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, विविध शेतकरी उत्पादक संस्था, कृषी स्टार्टअप्स तसेच पशुसंवर्धन क्षेत्रातील आधुनिक उपक्रमांचा समावेश करण्यात येणार आहे. याशिवाय यशस्वी शेतकरी, संशोधक आणि कृषी उद्योजक यांच्या सहभागातून विविध विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. आधुनिक शेतीच्या संधी आणि आव्हानांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. महिला शेतकरी सक्षमीकरण, कृषी क्षेत्रातील नवोन्मेष, मूल्यसाखळी विकास, कृषी प्रक्रिया आणि ग्रामीण उद्योजकता याविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष माहिती कक्ष उभारण्यात येणार आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांची माहितीही शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाईल, असेही मंत्री श्री. भरणे म्हणाले.



**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आज विदर्भ अकोला येथे आयोजित अधिवेशनात पत्रकारांचे १० महत्त्वपूर्ण ठराव यावेळी अधिवेशनात मांडून सर्वानुमते मंजूर करण्यात आले यावेळी राज्य सरकारने लाडकी बहीण याप्रमाणे लाडका पत्रकार योजना सुरू करावी असा ठराव महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे यांनी मांडली त्यास सर्वांमध्ये टाळ्यांच्या गजरात मंजूर करण्यात आली... एक मुखी मागणी या अधिवेशनात करण्यात आली**

# जुलै ऑफ काइंडनेस मधून देवकौठेच्या चिमुकल्यांची पाखरांना साद

## या चिमण्यांनो परत फिरा रे



संगमनेर ( प्रतिनिधी ) समाजामध्ये सकारात्मकता वाढीस लागावी याकरता कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून जुलै महिना हा मंथ ऑफ काइंडनेस राबवण्यात येत असून या अंतर्गत रामाजी गेनुजी पा.कहांडळ विद्यालय देवकवठे येथील विद्यार्थ्यांनी आपल्या घराजवळ परिसरात व शाळेच्या प्रांगणात पशुपक्ष्यांना चिमण्यांना खाद्य टाकून परत गावाकडे फिरण्याची साद घातली आहे.

रमाजी गेनुजी पाटील कहांडळ विद्यालय देवकवठे येथे विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी मंथ ऑफ काइंडेनेस हा अभिनव उपक्रम राबवला. यावेळी संगमनेर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक संजय लहारे, शिक्षक शरद शेवंते, ज्ञानदेव गाडेकर,रंगनाथ वारुंगसे, आशा सूर्यवंशी, सुशील कुमार गायकवाड, अब्दुल गणी पठाण, राजेन्द्र चत्तर,संदिप सोनवणे, मंगेश देसाई आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांनी समाजातील कटुता दूर होऊन सहिष्णुता आदरभाव आपुलकी जिव्हाळा वाढावा याकरता जुलै महिना हा मंथ ऑफ काइंडनेस म्हणून राबवण्याचे नियोजित केले यांतर्गत संगमनेर तालुक्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. देवकवठे गावामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील आजी आजोबांबरोबर गप्पा मारणे आई -वडिलांना शेतीकामात मदत करणे याचबरोबर घर परिसरात स्वच्छता करणे अशी कामे केली. याचबरोबर या चिमण्यांनो परत फिरा रे या उपक्रमांतर्गत घराच्या प्रांगणात व गावातील परिसरात पशुपक्ष्यांचे वाढ व्हावी याकरता त्यांना धान्य टाकले.

कहांडळ विद्यालयाच्या भव्य प्रांगणामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन विद्यालयाच्या बाजूनं असलेल्या घनदाट झाडींच्या भोवती चिमण्या व इतर पाखरांना दाणे टाकले. यावेळी या चिमण्यांनो परत फिरा रे ही सामूहिक साथ सर्वांनी घातली. निसर्गाची गाणी गात. बालगीते व बडबड गीते गात या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम मोठ्या आनंदाने साजरा केला. यावेळी बोलताना मुख्याध्यापक संजय लहारे म्हणाले की, ग्रामीण भागामध्ये पूर्वी चिमणी, कावळे यांसह खूप पक्षी असायचे मात्र ग्लोबल वार्मिंग ची समस्या पाण्याची दुर्भिक्ष आणि रासायनिक खतांचा वापर यामुळे ग्रामीण भागातील अनेक पशुपक्षी कमी झाली आहेत. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पशुपक्ष्यांची अत्यंत गरज आहे. मंथ ऑफ काइंडनेस अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये पशु पक्षांबद्दल आत्मीयता व जिव्हाळा वाढीसाठी प्रयत्न केला जात आहे.

कहांडळ विद्यालयाने कायम गुणवत्तेबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य दिले असून शिक्षणाच्या अद्यावत सुविधा दिल्या आहेत. या सर्व उपक्रमांमध्ये देवकवठे ग्रामस्थ व सिन्नर तालुक्यातील मलढोन, येथील विद्यार्थी व ग्रामस्थ यांचाही मोठा कायम सहभाग असल्याचे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे उपक्रमाचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात, मा.आ.डॉ. सुधीर तांबे,डॉ. जयश्रीताई थोरात, सौ.दुर्गाताई तांबे, स्कूल कमिटीचे अध्यक्ष भारत शेठ मुंगसे ,उपाध्यक्ष भागवतराव आरोटे, संचालक एकनाथ शेठ मुंगसे, इंजिनीयर सुभाषराव सांगळे, राजेंद्र कहांडळ, राजेंद्र मुंगसे,सतीश आभाळे, पोलीस पाटील शत्रुघ्न मुंगसे,राजाराम मुंगसे, गणेश सोनवणे, काशिनाथ त्रिंबक कहांडळ, सरपंच सौ ज्योती मोकळ ,चेअरमन तुकाराम कहांडळ, बाबासाहेब गाजरे, ज्ञानेश्वर मुंगसे,मलढोण गावचे सरपंच तानाजी बोंबले , दगडू बोंबले , किसनराव पावले, शिवाजी हलवर, गंगाधर पवार, दिनकर साबळे, अण्णा गेठे यांच्यासह मलढोल व देवकवठे येथील विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. मान्यवर पदाधिकारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय**
**ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**
EQJ COURT CASE NO - 00085/2026

१. सबाजी दगडु आरोटे, रा. ब्राम्हणवाडा, ता, अकोले, जि. अहिल्यानगर

**विरुद्ध.....** १. उल्हास रेवजी शिंदे, २. चंद्रकांत मारुती शिंदे, ३. विनोद रामजी शिंदे, ४. आनंदा रखमा शिंदे, ५. प्रदिप भिवा रोकडे, ६. दत्तात्रय विठ्ठल आरोटे, ७. भैरवी संजय गायकर, रा. ब्राम्हणवाडा, ता, अकोले, जि. अहिल्यानगर

या नोटीसाद्वारे कळविणेत येते की, अर्जदार सबाजी दगडु आरोटे, रा. ब्राम्हणवाडा, ता, अकोले, यांनी मौजे ब्राम्हणवाडा येथिल स.नं. २२१/११ चे क्षेत्र दुरुस्ती होणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

तरी अर्जदार यांनी सादर अर्जाबाबत दिनांक. २८/०७/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले येथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. आपणाकडे उपलब्ध कागदपत्रासह सदर दिनांकास आपण उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत आपले काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०७/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार अकोले तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## जिल्हाधिकारी यांची नेवासा तहसील कार्यालयात एस आयआर डिजिटायझेशन कामकाजाबाबत आढावा बैठक



**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुका डिजिटायझेशन मध्ये पिछाडीवर असल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारीश्री पंकजजी आशिया यांच्या प्रमुख उपस्थितीत नेवासा तालुक्यातील सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांची तहसील कार्यालयात एस आय आरडिजिटायझेशन कामकाजाबाबत आढावा बैठक घेण्यात आली.पुढील दोन दिवसात पंधरा टक्के वाढ / प्रगती करण्याचे सक्त निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

नेवासा तालुका डिजिटायझेशन मध्ये पिछाडीवर असल्यामुळे सद्या आवरेज गती ५५ टक्के आहे व नेवासा तालुक्याची डिजिटायझेशन टक्केवारी ४२ टक्के आहे. त्यामुळे बीएलओ व बीएलओ सुपरवायझर यांनी कामाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व कामाम ध्ये अपेक्षित प्रगती साधावी अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल असा ईशारा जिल्हाधिकारीपंकज आशिया यांनी यावेळी बोलतांना दिला.

## तामिळनाडुचे मुख्यमंत्री विजय थलपती यांची केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली सदिच्छा भेट

**चेन्नई/मुंबई(समर्थ गांवकरी)**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी आज तामिळनाडुचे मुख्यमंत्री विजय थलपती यांची आज सदिच्छा भेट घेतली. यावेळी झालेल्या चर्चे त ना. रामदास आठवले यांनी विजय थलपती यांना तामिळनाडुत मिळालेल्या बहुमताच्या विजयाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. तामिळनाडुतील दलितांवर वाढते अत्याचार आहेत ते रोखण्यासाठी अॅट्रोसीटी अॅक्टची कोटेकोरपणे अंम लबजावणी करावी. वाढत्या दलित अत्याचाराच्या घटना थांबवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले पाहिजे. तसेच तामिळनाडुतील दलितांना ५ एकर जमीन देवुन भुमिहीन दलितांना आधार द्यावा अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली. भारत सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयाच्या विविध लोककल्याणकारी योजनांच्या ज्या काही अडचणी असतील आणि त्याबाबतचा जो निधी असेल तो पुरेपुर निधी आपण पाठवु. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एनडीए सरकार सबका साथ सबका विकास या नीतीने काम करीत आहे. एनडीए प्रणित पक्षांचे जिथे सरकार नाही त्या राज्यांनाही समान निधी वाटप केला जातो.सर्व राज्यांना केंद्र सरकार आवश्यक तेव्हढा निधी देत असते तामिळनाडू ला ही पुरेपूर निधी केंद्र सरकार कडून दिला जाईल अशी असा विश्वास ना. रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री विजय थलपती यांच्या कडे व्यक्त केला.

निवडणुकीपूर्वी विजय थलपती यांनी एन डी ए सोबत येण्याचे आपण आवाहन केले होते त्याची आठवण ना. रामदास आठवले यांनी आज मुख्यमंत्री विजय थलपती यांना करून दिली.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर या भारत देशाच्या संविधानाचे शिल्पकार आहेत. त्यांच्याच संकल्पनेतुन रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली आहे.रिपब्लिकन पक्षाचे पहिले अध्यक्ष एन शिवराज हे तामिळनाडूचे होते असा

इतिहास ना. रामदास आठवले यांनी विजय थलपती यांना सांगितला. आपल्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्ष देशात २८ राज्यात आणि ८ केंद्रशासीत प्रदेशात कार्यरत आहे. तामिळनाडुतही रिपब्लिकन पक्षाचे चांगले संघटन आणि अनेक शाखा आहेत अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली. आपण चित्रपट क्षेत्रात चांगली कामगिरी करुन लोकप्रिय अभिनेते म्हणून पुढे आलात, आपल्या सारख्या लोकप्रिय अभिनेत्याला तामिळनाडुतील जनतेने मुख्यमंत्री पदाचा मान दिला. ही आपली ऐतिहासिक आपली चांगली काम गिरी असल्याचे अभिनंदन ना.राम दास आठवले यांनी मुख्यमंत्री विजय थलपती यांचे केले.

## राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)**

पाथर्डी शहरातील राजर्षी शाहू महाराज पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थेची ९ वी सर्वसाधारण सभा रविवारी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आणि उत्साहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये संपन्न झाली.

पतसंस्थेचे मार्गदर्शक दिलीप तिजोरे यांनी संस्थेच्या प्रगतीचा व आधुनिक चालू वाटचाल संदर्भात मार्गदर्शन केले तसेच संस्थेचे चेअरमन दिगंबर गाडे यांनी स्वागत प्रस्तावनामध्ये संस्थेस ३१ मार्च २०२६ ला संपलेल्या आर्थिक वर्षात ५८९२०१ निव्वळ नफा झाला आहे, असे नमूद केले यावर्षी संस्था सभासदांना ७% टक्के लाभांश देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.सर्वसाधारण सभा संपल्यानंतर लगेचच सभासदांना डिव्हीडंड देण्यात आला.

सभेपुढे एकूण १२ विषय होते ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले तसेच ऐनवेळच्या विषयांम ध्ये चेअरमन साहेबांनी वर्गणी वाढ बाबतीत प्रश्न उपस्थित केला असता त्यास सर्वानुमते मंजुरी मिळाली.

पतसंस्थेचे सचिव संपत घारे, संचालक अंबादास साठे, आत्माराम दहिफळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.व्यासपीठावर संचालक ज्ञानेश्वर गायके, पवनराव मोरे, राजेंद्र चव्हाण, दिलीप तिजोरे, संदीप उदमले, व्यवस्थापक रमेश लाटणे तसेच बहुसंख्येने सभासद उपस्थित होते.

# तपनेश्वर रोड येथील साई समर्थ स्टील भांड्याच्या दुकानात पोलीसांचा छापा

### शेतीपयोगी असलेल्या पावणे दहा लाख रुपये किमतीच्या १६३५ किलो तांब्याच्या तारा जप्त गुन्हा दाखल

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड - जामखेड शहरातील स्टील व भांड्याच्या दुकानात जामखेड पोलीसांनी छापा टाकला असता ३९ गोण्यामध्ये १६३५ किलोग्रॅम वजनाच्या तांब्याच्या लहाण मोठ्या, सोललेल्या तारा ज्या शेती पंपासाठी उपयोगात येतात अशा मिळुन आल्या. त्याबाबत यातील आरोपीकडे माल ताब्यात बाळगण्याबाबत विचारणा केली असता आरोपी याने कोणतेही कागदपत्रे सादर केले नाहीत तसेच सदर मालाबाबत उडवाउडवीची उत्तरे दिली तेव्हा सदर तांब्याच्या तारा या चोरीच्या असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीसांनी म हाराष्ट्रपोलीस अधिनियमकलम १२४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत जामखेड पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, जामखेड शहरातील तपनेश्वर रोड येथे महेश मोहनलाल भंडारी (वय ४८ वर्षे रा. तपनेश्वर रोड, जामखेड) यांचे साई समर्थ स्टील व भांड्याचे दुकान आहे. जामखेड पोलीसांना माहीती मिळाली की, सदर दुकानात शेतीपयोगी उपयुक्त असलेली तांब्याच्या लहान मोठ्या तारा आहे.

त्यानुसार पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गुरवार दिनांक १६ रोजी साडेआठ वाजता छापा टाकला असता साई समर्थ स्टील या भांडयाच्या दुकानात ९,७९,२००/- रुपये किं च्या लहाण मोठया ३९ गोण्यामध्ये एकुण १६३५ किलोग्रॅम तांब्याची सोललेली तार जी शेतीपंपासाठी उपयोगात येणारी त्याम ध्ये लहाण मोठे तुकडे आढळून आले. त्याबाबत यातील आरोपी महेश भंडारी याचेकडे माल ताब्यात बाळगण्याबाबत विचारणा केली असता आरोपी याने कोणतेही कागदपत्रे सादर केले नाहीत तसेच सदर मालाबाबत उडवाउडवीची उत्तरे दिली यावरून पोलिसांची खात्री झाली की, सदर तांब्याच्या तारा या चोरीच्या आहेत. पोलीस कॉन्स्टेबल कुलदिप घोळवे यांच्या फिर्यादीवरून १२४ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक अजित मोरे करत आहेत.



## प्राध्यापकाचा विनयभंग प्रकरणातील न्यायालयीन लढा अपयशी; संस्थेचा बडतर्फीचा निर्णय विद्यापीठ न्यायाधीकरणाकडून कायम

**अकोले (समर्थ गांवकरी)**

येथील अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले या वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकाने केलेल्या विनयभंग प्रकरणात माननीय विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाने संस्थेच्या बाजूने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. संबंधित प्राध्यापकावर झालेल्या विनयभंगाच्या आरोपांनंतर संस्थेने केलेली बडतर्फीची आणि शिस्तभंगाची कारवाई कायदेशीरदृष्ट्या योग्य असल्याचे न्यायाधिकरणाने मान्य केले आहे.

काही काळापूर्वी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विषयाचे प्रा.यासीन गुलाबभाई सय्यद यांनी पदाचा गैरवापर करत विनयभंग केल्याची गंभीर तक्रार समोर आली होती. या प्रकरणाची दखल घेत संस्थेने अंतर्गत चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित प्राध्यापकाला तातडीने सेवेतून बडतर्फ केले होते. संस्थेच्या या शिस्तभंग विषयक निर्णयाविरोधात संबंधित प्राध्यापकाने विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणात याचिका दाखल केली होती व बडतर्फीचा आदेश रद्द करण्याची मागणी केली होती.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे विचारात घेऊन न्यायाधिकरणाने प्राध्यापकाची याचिका फेटाळून लावली. संस्थेने केलेली कारवाई योग्य ठरवत संबंधित प्राध्यापकाला सेवेतून मुदतपूर्व निवृत्त करण्यात यावे, असे आदेश न्यायाधिकरणाने दिले आहेत. तसेच प्राध्यापकाच्या वर्तवणुकीची गंभीर दखल घेत, त्याला पूर्ण निवृत्तीवेतन न देता केवळ ७५ टक्केच निवृत्तीवेतन मंजूर करण्यात यावे, असे स्पष्ट आदेश न्यायाधिकरणाने दिले आहेत.

न्यायाधिकरणाच्या या निर्णयाचे संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे. महाविद्यालयीन परिसर, विशेषतः विद्यार्थिनी आणि महिला




कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित असणे ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. गैरवर्तणूक करणाऱ्या कोणत्याही घटकाला संस्थेत स्थान नाही, हाच संदेश या निकालातून स्पष्ट झाला आहे, अशी प्रतिक्रिया संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर व सेक्रेटरी सुधाकर देशमुख यांनी संयुक्तरीत्या दिली आहे. या निकालामुळे शैक्षणिक क्षेत्रात महिलांच्या सुरक्षेबाबत संस्थेने घेतलेल्या कणखर भूमिकेवर शिक्कामोर्तब झाले आहे.

## तालुकास्तरीय तक्रार निवारण समितींची फेररचना

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व कीटकनाशके उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून याबाबत आलेल्या तक्रारींचे जलद व पारदर्शक पद्धतीने निराकरण करण्यासही प्राथमिकता आहे. यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांची फेररचना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पुढील सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष शेतावर जाऊन तपासणी करून अहवाल अंतिम करण्यात येणार आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

कृषी मंत्री श्री. भरणे म्हणाले, खरीप हंगामात बियाण्यांच्या उगवण क्षमतेसह खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा तक्रारींचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण व्हावे, यासाठी शासनाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची सुधारित रचना लागू केली आहे.

तालुका कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीत कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र किंवा कृषी विज्ञान केंद्र, महाबीज यांचा प्रतिनिधी, संबंधित कृषी अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि वस्तुनिष्ठ तपासणी होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होईल, असेही कृषी मंत्री यांनी सांगितले.

तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित कंपनीचे प्रतिनिधी आणि विक्रेत्यांना तपासणीवेळी उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आल्याचे सांगत मंत्री श्री. भरणे म्हणाले, शेतकऱ्यांकडील खरेदी पावत्यांची पडताळणी करून विहित नमुन्यात पंचनामा करण्यात येईल. तसेच संबंधित बियाण्यांच्या लॉटचे नमुने अधिसूचित प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. यामुळे तक्रारींची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर नियमानुसार कारवाई करणे सुलभ होणार आहे.

मंत्री श्री. भरणे म्हणाले, तालुक्यात तक्रारींची संख्या १०० पेक्षा अधिक झाल्यास आवश्यकतेनुसार अतिरिक्त तक्रार निवारण समि त्या स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली असून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना तातडीने समित्या गठित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना दर्जे दार कृषी निविष्ठा उपलब्ध करणे, दोषी उत्पादक किंवा विक्रेत्यांवर कठोर कारवाई आणि प्रत्येक तक्रारीचे वेळेत निराकरण करणे, यासाठी कृषी विभाग विशेष दक्षता घेणार आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे.

## अहिल्यानगरमध्ये आणखी एका मल्टीस्टेट पतसंस्थेत ठेवीदारांची फसवणूक; चेअरमनसह संचालकावर गून्हा दाखल

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

गुंतवणूकदारांना आकर्षित करून त्यांच्या कष्टाची कोट्यवधी रुपयांची ठेव हडप केल्याचा खळबळजनक प्रकार अहिल्यानगरमध्ये समोर आला आहे. श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेट पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात आणि बुरुडगाव रस्त्यावरील चाणक्य चौक शाखेत हा मोठा आर्थिक घोटाळा झाला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पतसंस्थेच्या चेअरमन आणि संचालकांसह एकूण सात जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सतिष रामचंद्र पटारे (वय ५४, धंदा- ड्रायव्हर, रा. गुगळे कॉलनी, बु-हानगर, अहिल्यानगर) आणि इतर काही साक्षीदारांनी या पतसंस्थेमध्ये आपली हक्काची रक्कम मुदत ठेव आणि फिक्स डिपॉझिट म्हणून ठेवली होती. सर्व गुंतवणूकदारांची मिळून एकूण २ कोटी ४४ लाख ४२ हजार ३७७ रुपये एवढी रक्कम संस्थेकडे जमा होती. या ठेवींची मुदत संपल्यानंतर फिर्यादी आणि इतर ठेवीदारांनी पतसंस्थेकडे आपल्या हक्काच्या पैशांची मागणी केली. मात्र, पतसंस्थेच्या प्रशासनाने ही रक्कम व्याजासह परत करण्यास स्पष्ट नकार दिला.

भगवानबाबा पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ठेवीदारांच्या पैशांचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करून संपूर्ण संस्थेची आणि गुंतवणूकदारांची मोठी फसवणूक केल्याचे तपासात सम ोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी संस्थेच्या चेअरमन मंदाकिनी रंगनाथ वैद्य, व्हाईस चेअरमन मथुर रंगनाथ वैद्य, संचालक नितीन सोपानराव तुपे, शांतीनाथ नागनाथ साखरे, राम लक्ष्मण पोपळघट, किशोर अनिल सुरवसे आणि संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी जयशाली मयुर वैद्य (सर्व राहणार बाळमटाकळी, शेवगाव व अहिल्यानगर) यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक पांडुरंग मेढे आणि गणेश देशमुख पुढील तपास करत आहेत.

## महाराष्ट्राचा लाडका कवी २०२६स्पर्धेतील विजेते कविवर्य दत्तात्रय वारकड यांना प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

काव्ययोग काव्यसंस्था,पुणे यांच्या वतीने महाराष्ट्राचा लाडका कवी २०२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत महाराष्ट्रातील १८७ कवींनी भाग घेतला होता.

या स्पर्धेत अहिल्यानगर येथील कविवर्य दत्तात्रय वारकड यांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या जीवन प्रवास वर्णन करणारी ,ज्ञानज्योत स्वरचित काव्य सादर केले.

या ऑनलाइन स्पर्धेला कवी दत्तात्रय वारकड यांना ९७०० व्हिवज् मिळाले.असून १४०० लाईक तर ४०५ कमेंट मिळाले आहेत.

महाराष्ट्रात सर्वाधिक मते व कवितेला मोठ्या प्रमाणात पसंती मि ळाल्याने काव्ययोग काव्यसंस्थेच्या वतीने कविवर्य दत्तात्रय वारकड यांना महाराष्ट्राचा लाडका कवी स्पर्धेत प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



या कवितेला रसिक प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.या कवितेला लेखक,कवि,साहित्यिक क्षेत्रातील, डॉक्टर, वकील राजकीय मंडळी,नगरसेवक, महापौर ,उपम हापौर, पत्रकार विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कवितेला उत्कृष्ट अभिप्राय दिले आहे. तसेच रशिया, दुबई ,मुंबई ,बिहार, गुजरात, म हाराष्ट्र या ठिकाणच्या व्यक्तींकडून कवितेला सुंदर असे अभिप्राय आले आहेत.

या पुरस्कारामुळे अहिल्यानगर जिल्ह्याला बहुमान मिळाला आहे.या यशाबद्दल कवी दत्तात्रय वारकड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पेट्रोलपंप डिलरशिपच्या आमिषाने जामखेडच्या व्यावसायिकाची ८४.५३ लाखांची ऑनलाइन फसवणूक

### प्रोसेसिंग फी, परवाना व प्रशासकीय शुल्कांच्या नावाखाली उकळले लाखो रुपये

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

पेट्रोलपंपाची डिलरशिप मिळवून देण्याचे आमिष दाखवत जामखेड येथील एका व्यावसायिकाची तब्बल ८४ लाख ५३ हजार रुपयांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रोसेसिंग फी, परवाना, सिक्युरिटी डिपॉझिट, कागदपत्रांची पडताळणी तसेच विविध प्रशासकीय शुल्कांच्या नावाखाली आरोपींनी वेळोवेळी मोठ्या रकमा उकळल्या. मात्र, अखेर पेट्रोलपंपाची डिलरशिप न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित व्यावसायिकाने सायबर पोलिस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी बुधवारी दोन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी उदय गुलाबराव शिंदे (वय ५४, रा. रामेश्वर एजन्सी, मार्केटयार्डसमोर, बीड रोड, जामखेड) यांचे जामखेड येथे कृषी सेवा केंद्र आहे. आरोपी सौरभ अग्रवाल व शिंदे (पूर्ण नाव माहीत नाही) यांनी

### दोघांविरुद्ध सायबर पोलिसांत गुन्हा

फिर्यादींशी संपर्क साधून 'जिओ' कंपनीचा पेट्रोलपंप उभारण्यासाठी अधिकृत डिलरशिप व परवाना मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

त्यासाठी कंपनीकडून मंजुरी मिळविणे, प्रोसेसिंग फी, सिक्युरिटी डिपॉझिट, कागदपत्रांची छाननी, परवाना शुल्क तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांसाठी पैसे भरावे लागतील, असे सांगत आरोपींनी वेळोवेळी मोठ्या रकमेची मागणी केली. डिलरशिप निश्चित मिळणार असल्याचा विश्वास निर्माण करून त्यांनी फिर्यादींकडून विविध बँक खात्यांमध्ये तसेच ऑनलाइन व्यवहारांद्वारे पैसे जमा करून घेतले.

ऑक्टोबर २०२५ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत फिर्यादी उदय शिंदे यांनी आरोपींनी सांगितलेल्या खात्यांमध्ये एकूण ८४ लाख ५३ हजार रुपये जमा केले. एवढी मोठी रक्कम भरूनही ना पेट्रोलपंपाची डिलरशिप मिळाली, ना अधिकृत परवाना मिळाला. उलट आरोपींकडून सतत टाळाटाळ केली जात असल्याने फिर्यादींना संशय आला.

त्यानंतर त्यांनी स्वतः चौकशी केली असता संपूर्ण व्यवहार फसवणुकीचा असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून, त्यांचा शोध सुरू आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असून, आरोपींनी वापरलेली बँक खाती, ऑनलाइन व्यवहार आणि तांत्रिक पुराव्यांची सखोल तपासणी करण्यात येत आहे.

नागरिकांना पोलिसांचे आवाहन

सायबर पोलिसांनी नागरिकांना कोणत्याही कंपनीची डिलरशिप, फ्रँचायझी किंवा गुंतवणुकीच्या नावाखाली मोठी रक्कम भरण्यापूर्वी संबंधित कंपनीकडून अधिकृत पडताळणी करण्याचे आवाहन केले आहे. सोशल मीडिया, फोन किंवा ई-मेलद्वारे मिळणाऱ्या आकर्षक ऑफरवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी आणि संशयास्पद व्यवहार आढळल्यास तात्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राची समृद्ध वस्त्रपरंपरा दिल्लीकरांच्या भेटीला

### महाराष्ट्र सदन येथे तीन दिवसीय वस्त्रोद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, नागपूर (महाटेक्स) आणि येथील महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने कस्तुरबा गांधी मार्गावरील नवीन महाराष्ट्र सदनात आयोजित विशेष वस्त्रोद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती श्वेता सिंघल यांच्या हस्ते झाले.

प्रगती मैदान येथील भारत मंडपममध्ये नुकत्याच झालेल्या 'भारत टेक्स २०२६' च्या धर्तीवर महाराष्ट्राच्या समृद्ध वस्त्रोद्योग परंपरेचा परिचय दिल्लीकरांना करून देण्यासाठी कस्तुरबा गांधी मार्गावरील नवीन महाराष्ट्र सदन येथे १८ ते २० जुलै २०२६ या कालावधीत या तीन दिवसीय वस्त्रोद्योग प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती श्वेता सिंघल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार आणि व्यवस्थापक प्रमोद कोलापटे उपस्थित होते. तसेच रेशीम संचालनालयाचे उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे, रेशीम विकास अधिकारी संदीप आगवणे, अशोक वडवले, महाटेक्सचे गणेश ठाकूर, रूपेश खापेकर आदी उपस्थित होते.

दिल्लीतील नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देऊन महाराष्ट्रातील विणकर आणि कारागिरांकडून दर्जेदार उत्पादने थेट खरेदी करून 'व्होकल फॉर लोकल' संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन निवासी आयुक्त श्वेता सिंघल यांनी केले.

'भारत टेक्स २०२६'मध्ये महाराष्ट्राच्या दालनाला देश-विदेशातील खरेदीदारांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील विणकर, कारागिर आणि स्वयं-सहायता गटांनी तयार केलेली उत्पादने दिल्लीसारख्या मोठ्या बाजारपेठेत थेट ग्राहकांपर्यंत पोहोचावीत, तसेच महाराष्ट्राच्या समृद्ध वस्त्रवारशाचा व्यापक प्रचार व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.



या प्रदर्शनात महाराष्ट्राच्या पारंपरिक वस्त्रकलेचा समृद्ध वारसा अनुभवता येणार असून, अस्सल पैठणी, करवत काठी साड्या, पारंपरिक हिमरू, खण, सोलापूरच्या प्रसिद्ध चादरी, बांबू व टेरी टॉवेल्स तसेच जीआय (GI) टॅग प्राप्त कोल्हापुरी चपला यांसह विविध हातमाग व रेशीम उत्पादने थेट विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत.हे प्रदर्शन १८ ते २० जुलै २०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ८.०० या वेळेत सर्व नागरिकांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### वसुंधरा अकॅडेमीत स्वसंरक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न




**अकोले (समर्थ गांवकरी)**

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अकॅडमी, अकोले येथे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, धैर्य, शिस्त आणि वैयक्तिक सुरक्षिततेची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने स्वसंरक्षण कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध स्वसंरक्षण तंत्रांचा प्रत्यक्ष सराव केला. यावेळी स्वसंरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशिक्षक श्री. विवेक लहानू शेटे यांचे स्वागत व सत्कार उपप्राचार्या राधिका नवले यांच्या हस्ते करण्यात आले.

मार्गदर्शन करताना श्री. विवेक शेटे यांनी विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचे संरक्षण कसे करावे, संकटसमयी शांत राहून योग्य निर्णय कसा घ्यावा, अनोळखी व्यक्तींशी वावरताना कोणती खबरदारी घ्यावी तसेच आत्मविश्वासाने कोणत्याही प्रसंगाला कसे सामोरे जावे याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विविध स्वसंरक्षण तंत्रांचे प्रात्यक्षिक करून दाखविले आणि विद्यार्थ्यांकडून त्याचा प्रत्यक्ष सरावही करून घेतला.

या कार्यशाळेत इयत्ता पाचवी ते नववीच्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवत स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, धैर्य आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

### डिंभे धरण ५२ टक्क्यांवर गेल्या वर्षीपेक्षा पातळी ६ मीटरने कमी




**मंचर (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील हुतात्मा बाबू गेनू जलाशय अर्थात डिंभे धरणातील पाणीसाठा शनिवारी सकाळी ६ वाजेपर्यंत ५२ टक्के इतका झाला आहे. गेल्या वर्षीपेक्षा धरणातील पाणी पातळी सहा मीटरने कमी आहे. धरणाची सध्याची पाणीपातळी ७०७.७४ मीटर आहे.

जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार माहितीनुसार, डिंभे धरणात एकूण २१२.०१ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आहे. त्यापैकी उपयुक्त पाणीसाठा १८३.६९ दशलक्ष घनमीटर आहे. सध्या धरणातून कोणत्याही कालव्यातून, नदीतून किंवा विजघरातून पाण्याचा विसर्ग सुरू नाही. सांडवा देखील बंद आहे.

गेल्या २४ तासात धरण क्षेत्रात केवळ ६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. हंगामाच्या सुरुवातीपासून आतापर्यंत एकूण ५९६.०० मिमी पाऊस झाला आहे.

गेल्या वर्षीची धरण साठ्याची स्थिती उत्तम होती.

गेल्या वर्षी याच दिवशी धरणाची पाणीपातळी ७१३.७३ मीटर होती. त्यावेळी पाणीसाठा ७५.४२ टक्के होता. तसेच हंगामातील एकूण पाऊस १३५९.०० मिमी नोंदवला गेला होता.गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीपातळी ५.९ मीटरने कमी आहे. टक्केवारीत २३.४९ टक्क्यांची घट आहे. एकूण पावसातही ७६३ मिमची मोठी तूट आहे. डिंभे धरणावरून आंबेगाव, जुन्नर पारनेर, शिरूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील काही तालुक्यांना पाणीपुरवठा केला जातो. सध्या साठा समाधानकारक नसल्याने पुढील पाऊस महत्त्वाचा ठरणार आहे. पावसाने अशीच गती घेतली नाही तर ऑगस्टमध्ये पाणी कपातीचा निर्णय घ्यावा लागू शकतो, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### पंढरपूरसाठी नेवासा येथून जादा बसेसची व्यवस्था

**चाळीस प्रवासी झाल्यास थेट गावात एस टी येणार**

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

आषाढी एकादशी उत्सवाच्या निमित्ताने राज्यातील हजारो दिंडया हया पंढरीच्या वाटेवर मार्गक्रमण करत असतांना जेष्ठांसह सर्वसामान्य वारकरी भाविकांना पंढरीच्या विठुरायाचे दर्शन घेता यावे म्हणून नेवासा येथील आगारातून दि.१७ जुलै पासून पंढरपूरला जाण्यासाठी जादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली असून एका गावातून ४० प्रवाशी उपलब्ध झाल्यास त्या गावात एस टी बस पाठवून सेवा दिली जाईल अशी माहिती आगार व्यवस्थापक प्रशांत होले यांनी दिली.आषाढी वारी सोहळयाच्या निमित्ताने देवगड संस्थानच्या पंढरपूर येथील भक्त निवासमध्ये दि.२० जुलै ते २६ जुलै या कालावधीत गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह होत असल्याने येथे गाथा पारायणासाठी जाणाऱ्या नेवासा तालुक्यातील वारकरी भाविकांसाठी नेवासा बस स्थानकामधून सकाळी ७ वाजता त्यानंतर सकाळी ७.३० व८.३० यावेळेत तीन गाड्या जादा बसेसची व्यवस्था करण्यात आली असल्याचे आगार प्रमुख प्रशांत होले यांनी सांगितले. प्रत्येकाला नेवासा येथे येणे शक्य नसल्याने जर एखाद्या गावात चाळीस प्रवाशी उपलब्ध झाले तर त्या गावापासून एस टी महामंडळाच्या वतीने बस सेवा पंढरपूरला जाण्यासाठी उपलब्ध करण्यात येईल त्यासाठी त्या गावातील व्यक्तींनी तशी यादी आमच्याकडे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.पंढरपूर यात्रेसाठी नेवासा आगारातून जादा बस गाड्या सोडण्यात येत असल्याने प्रवासी व वारकरी भाविकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन आगार प्रमुख प्रशांत होले यांनी केले आहे.

# प्रवरा माध्यमिक विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनीचा राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभाग





**पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील भुतेटाकळी येथील प्रवरा माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेमध्ये आपला उत्कृष्ट सहभाग नोंदवला.

साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी संचलित श्री साईबाबा इंग्लिश मीडियम स्कूल शिर्डी यांनी श्री साईबाबा राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा १४ जुलै ते १७ जुलै या काळात साईबाबा सांस्कृतिक भवन नवीन शैक्षणिक संकुल हेलिपॅड रोड शिर्डी येथे दोन गटात आयोजित केल्या होत्या, त्यामध्ये राज्यातील लहान गटासाठी ७१ शाळांनी तर मोठ्या गटासाठी ७६ शाळांनी सहभाग नोंदवला. यामध्ये विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी १) फुंदे वैष्णवी मल्हारी हिने आजच्या समाजाला श्री साईबाबांच्या शिकवणुकीची आवश्यकता २) फुंदे भाग्यश्री संतोष हिने श्री साईबाबांची अकरा वचने जीवनमंत्र या विषयावर दि. १७ /७/ २०२६ रोजी आपला राज्यस्तरीय सहभाग नोंदवला. अतिशय उत्कृष्टपणे दिलेल्या वेळेत आपले वकृत्व सादर केले. कौतुकाची दाद त्यांना मिळाली. शिर्डी संस्थांच्या वतीने त्यांना श्री साई सच्चरित मराठी ग्रंथ, प्रमाणपत्र तसेच साईबाबा संस्थानचे २०२६ चे कॅलेंडर देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

त्यांना विद्यालयाचे मार्गदर्शक शिक्षक फुंदे बाळासाहेब यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे मुख्याध्यापक पठाण आसिफ यांनी दोन्ही विद्यार्थिनींचा व मार्गदर्शक शिक्षकाचा विद्यालयाच्या वतीने सत्कार केला

व भविष्यात ही अशाच वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये विद्यार्थी सहभाग नोंदवतील अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेत दोन नव्या पुरस्कारांची मागणी

### स्व.अजितदादा पवार व स्व.जालिंदर कामटे यांच्या नावाने आदर्श पुरस्कार सुरू करावेत : पांडुरंग पवार

**आळेफाटा (समर्थ गांवकरी)**



जिल्हा परिषदेत चांगले काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधींचा सन्मान व्हावा यासाठी जिल्हा परिषद पुणेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांनी दोन नवीन पुरस्कार सुरू करावेत यासाठी वीरधवल जगदाळे, अध्यक्ष, जिल्हा परिषद पुणे, विवेक दादा वळसे पाटील, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद पुणे तसेच गजानन पाटील साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांच्याकडे मागणी केली

पत्रात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या नावाने जिल्हा परिषदेमध्ये आदर्श काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना स्व. अजितदादा पवार आदर्श जिल्हा पदाधिकारी पुरस्कार सुरू करावा. तसेच पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय जालिंदर भाऊ कामटे यांच्या नावाने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एका आदर्श सरपंचाची निवड करून त्यांना स्व. जालिंदर भाऊ कामटे आदर्श सरपंच पुरस्कारदेण्यात यावा. गावपातळीपासून जिल्हापातळीपर्यंत प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे, हा या मागणीमागील उद्देश असल्याचे श्री. पवार यांनी पत्रात नमूद केले आहे. या दोन्ही पुरस्कारांची सुरुवात याच वर्षापासून करावी यासाठी सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

# बियाणे, खते व कीटकनाशकसंदर्भात तक्रारींचे सात दिवसांत होणार निराकरण : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

### तालुकास्तरीय तक्रार निवारण समितींची फेरररचना

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व कीटकनाशके उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून याबाबत आलेल्या तक्रारींचे जलद व पारदर्शक पद्धतीने निराकरण करण्यासही प्राथमिकता आहे. यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांची फेररचना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पुढील सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष शेतावर जाऊन तपासणी करून अहवाल अंतिम करण्यात येणार आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

कृषी मंत्री श्री. भरणे म्हणाले, खरीप हंगामात बियाण्यांच्या उगवण क्षमतेसह खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा तक्रारींचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण व्हावे, यासाठी शासनाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची सुधारित रचना लागू केली आहे. तालुका कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीत कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र किंवा कृषी विज्ञान केंद्र, महाबीज यांचा प्रतिनिधी, संबंधित कृषी अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि वस्तुनिष्ठ तपासणी होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होईल, असेही कृषी मंत्री यांनी सांगितले.

तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित कंपनीचे प्रतिनिधी आणि विक्रेत्यांना तपासणीवेळी उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आल्याचे सांगत मंत्री श्री. भरणे म्हणाले, शेतकऱ्यांकडील खरेदी पावत्यांची पडताळणी करून विहित नमुन्यात पंचनामा करण्यात येईल. तसेच संबंधित बियाण्यांच्या लॉटचे नमुने अधिसूचित प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. यामुळे तक्रारींची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर नियमानुसार कारवाई करणे सुलभ होणार आहे.

मंत्री श्री. भरणे म्हणाले, तालुक्यात तक्रारींची संख्या १०० पेक्षा अधिक झाल्यास आवश्यकतेनुसार अतिरिक्त तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली असून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना तातडीने समित्या गठित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# जिल्हाधिकारी यांची नेवासा तहसील कार्यालयात एस आयआर डिजिटायझेशन कामकाजाबाबत आढावा बैठक

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुका डिजिटायझेशन मध्ये पिछाडीवर असल्यामुळेअहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारीश्री पंकजजी आशिया यांच्या प्रमुख उपस्थितीत नेवासा तालुक्यातील सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांची तहसील कार्यालयात एस आय आरडिजिटायझेशन कामकाजाबाबत आढावा बैठक घेण्यात आली.पुढील दोन दिवसात पंधरा टक्के वाढ /प्रगती करण्याचे सक्त निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिलेले आहेत.



नेवासा तालुका डिजिटायझेशन मध्ये पिछाडीवर असल्यामुळे सद्या आवरेज गती ५५ टक्के आहे व नेवासा तालुक्याची डिजिटायझेशन टक्केवारी ४२ टक्के आहे.

त्यामुळे बीएलओ व बीएलओ सुपरवायझर यांनी कामाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व कामामध्ये अपेक्षित प्रगती साधावी अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल

असा ईशारा जिल्हाधिकारीपंकज आशिया यांनी यावेळी बोलतांना दिला. सदर बैठकीच्या प्रसंगी नेवासा तालुक्याचे तहसीलदार डॉ. संजय बिरादार,अप्पर तहसीलदार सोनाली मात्रे,निवासी नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे,संदीप चिंतामनी,सहायक अभियंता प्रविण दहातोंडे,सहायक अभियंता आनंद रूपनर,शाखा अभियंता जितेंद्र कावळे,संतोष बांगर,इंजिनिअर शंकरराव ओहोळ यांच्यासह नेवासा तालुक्यातील सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

# पाडोशी परिसरातील ३०० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप

### डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शैक्षणिक सहाय्यता ग्रुप, पुणेचा स्तुत्य उपक्रम; शैक्षणिक साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी उभारी

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ग्रामीण, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देण्याच्या उद्देशाने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शैक्षणिक सहाय्यता ग्रुप, पुणे यांच्या वतीने पाडोशी केंद्रातील विविध पंधरा जिल्हा परिषद शाळांमधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाल्याने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमांतर्गत पाडोशी, पेढेवाडी, शेरेवाडी, कोकणवाडी, पाचपट्टा, पांगवाडी, पट्टेवाडी, पिंपळदरावाडी, रामवाडी, शिवाजीनगर, सोमठाणे, वाकी, धारवाडी व गंभीरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, पेन, पेन्सिल, चित्रकला वही रंगसाहित्य तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शैक्षणिक सहाय्यता ग्रुप, पुणे यांच्या वतीने उद्धवराज टेमकर, सुप्रिया टेमकर, शिवदेव माचवे, माया माचवे, विद्या गुंड, धनराज गुंड, अजय पासलकर, प्रियंका पासलकर, शिवकल्याण चव्हाण, भालचंद्र धुमाळ, महेश कुलकर्णी, शुभांगी कुलकर्णी, राजेश उदमले, सचिन म्हस्के, कामिनी म्हस्के, यश बोठे, वैशाली भांड, महेश शिंदे व अर्चना शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमात संस्थेचे प्रतिनिधी उद्धवराज टेमकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, शिक्षण हीच सर्वात मोठी संपत्ती असून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक साहित्य प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचावे, अशी भावना व्यक्त केली. उपस्थित शिक्षकांनीही या उपक्रमाबद्दल संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या शैक्षणिक उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, त्यांच्या शिक्षणाचा प्रवास अधिक सुकर व प्रेरणादायी होण्यास निश्चितच मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषदेच्या पेढेवाडी शाळेत झालेल्या मुख्य वाटप कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयवंत बोंबले यांनी सूत्रसंचालन किरण शिरोळे यांनी तर सुभाष जोंधळे यांनी आभार मानले.

तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी डॉ. बाळासाहेब दोरगे यांनी संस्थेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेच्या सदस्यांचे अभिनंदन करत सामाजिक कार्यास शुभेच्छा दिल्या. ज्ञानदीप प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊसाहेब कासार यांनी समन्वय करत स्कूल किट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावेत यासाठी विशेष प्रयत्न केले.



या कार्यक्रमासाठी सुरेखा फापाळे, केंद्रप्रमुख पंढरीनाथ वाघुर्डे, लक्ष्मण मेमाणे, नवनाथ हंबर्डे, अरुण गाढे, सुरेश पिचड, बहिरू साबळे, सुनंदा खताळ, सुवर्णा जाधव, वंदना तळपाडे तसेच पेढेवाडीचे सरपंच भागवत गातवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळू शिरसाट, सीताराम बोऱ्हाडे गुरुजी, सोमनाथ गोडे व सुदाम धिंदळे अरुण कोटकर, अजय कचरे यांचं केंद्रातील शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले.